भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४

(१९५४ चा अधिनियम क्रमांक ३७)

[१ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Prevention of Food Adulteration Act, 1954

(Act No. 37 of 1954)

[As in force on the 1st March 1995]

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९८

[ किंमत रु. ५-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रिवेन्शन ऑफ फूड ॲडल्टरेशन ॲक्ट, १९५४ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक १, दिनांक २२ जून १९९५ यात पृष्ठ १७ ते ३६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतीच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

के. एल. मोहनपुरिया,<br>सचिव, भारत सरकार.

नवी दिल्ली,<br>दिनांक २२ जून १९९५.

## PREFACE

This edition of the prevention of food Adulteration Act, 1954 as on the 1st March 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 6, dated 22nd June 1995 on pages 17 to 36.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (a) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

K. L. MOHANPURIYA,<br>Secretary to the<br>Government of India.

New Delhi,<br>Date : 22nd June 1995.

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'विधि अनुकूलन (क्र. ३ ) आदेश, १९५६ '.

२. 'अन्नभेसळ प्रतिबंध (विशोधन अधिनियम, १९६४ ' (१९६४ चा ४९).

३. 'अन्नभेसळ प्रतिबंध (विशोधन) अधिनियम, १९७१ ' (१९७१ चा ४१).

४. 'अन्नभेसळ प्रतिबंध (विशोधन) अधिनियम, १९७६ ' (१९७६ चा ३४).

५. 'अन्नभेसळ प्रतिबंध (विशोधन अधिनियम, १९८६ ' (१९८६ चा ७०).

# अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४

## कलमांचा क्रम

कलमे

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

२क. अर्थ लावण्याचा नियम.

केंद्रीय अन्न मानक समिती व केंद्रीय अन्न प्रयोग शाळा

३. केंद्रीय अन्न मानक समिती.

३क. सचिव व इतर कर्मचारीवर्ग यांची नियुक्ती.

४. केंद्रीय अन्न प्रयोग शाळा.

अन्नविषक सर्वसाधारण उपबंध

५. विवक्षित अन्नपदार्थांच्या आयातीस बंदी.

६. सागरी सीमाशुल्क कायदा लागू करणे आणि सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या शक्ती.

७. विवक्षित अन्नपदार्थांची निर्मिती, विक्री, इत्यादींस बंदी.

अन्नाचे विश्लेषण

८. शासकीय विश्लेषक.

९. अन्न निरीक्षक.

१०. अन्न निरीक्षकांच्या शक्ती.

११. अन्न निरीक्षकांनी अनुसरावयाची कार्यपद्धती.

१२. खरेदीदाराला अन्नाचे विश्लेषण करून घेता येईल.

१३. शासकीय विश्लेषकाचा अभिप्राय.

संकीर्ण

१४. निर्माणक, वितरक आणि व्यापारी यांनी प्राश्वासन द्यावयाचे.

१४क. विक्रेत्याने अन्नपदार्थ ज्या व्यतीकडून खरेदी केला तिचे नाव, इत्यादी उघड करणे.

१५. अन्नविषबाधेबाबत अधिसूचना.

१६. शिक्षा.

१६क. खटल्यांची संक्षिप्त संपरीक्षा करण्याची न्यायालयाची शक्ती.

कलम

१७. कंपन्यांनी केलेले अपराध.

१८. संपत्ती समपहृत करणे.

१९. या अधिनियमाखालील खटल्यांमध्ये कोणते बचाव देता येतील किंवा देता येणार नाहीत.

२०. अपराधांची दखल घेणे व संपरीक्षा.

२०क. निर्माणक, इत्यादींवर खटला चालविण्याची न्यायालयाची शक्ती.

२०कक. अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ व फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम ३६० लागू करणे.

२१. वाढीव शिक्षा ठोठावण्याची दंडाधिकाऱ्यांची शक्ती.

२२. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

२२क. केंद्र शासनाची निदेश शक्ती.

२३. केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

२४. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

२५. निरसन व्यावृत्ती.

# अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४

(१९५४ चा अधिनियम क्रमांक ३७)
( १ मार्च, १९९५ रोजी यथाविद्यमान)

[२९ सप्टेंबर, १९५४]

अन्नभेसळीस प्रतिबंध करण्यासाठी उपबंध करण्याबाबत अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या पाचव्या वर्षी संसदेकडून पुढील प्रमाणे अधिनियमीत होवो :—

## प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास अन्नभेसळ प्रतिबंध अधिनियम, १९५४ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार [1] * * * संपूर्ण भारतभर आहे.

(३) हा अधिनियम केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनद्वारे नियत करील अशा [2]दिनांकास अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

[3][ (एक) "भेसळकारी पदार्थ" याचा अर्थ, भेसळ करण्याच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येणारा किंवा वापरात येईल असा कोणताही पदार्थ, असा आहे; ]

[4][ (एक-क्) ] "भेसळयुक्त"—एखादा अन्नपदार्थ पुढीलबाबतीत भेसळयुक्त असल्याचे मानले जाईल :—

(क्) जर विक्रेत्याने विकलेल्या अन्नपदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्या पदार्थाची प्रत खरेदीदाराच्या मागणीनुसार नसून, त्यामुळे त्याचा तोटा होण्यासारखा असेल अथवा तो जसा दिसतो किंवा जसा आहे असे अभिवेदन करण्यात आले आहे तशा गुणधर्माचा किंवा तशा मुख्य द्रव्याचा किंवा तशा प्रतिचा बनवलेला नसेल तर ;

(ख्) ज्यामुळे त्या पदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्या पदार्थाची प्रत यांच्यावर अपायकारक परिणाम होईल असे इतर कोणतेही द्रव्य त्यात असेल किंवा अशा प्रकारे त्या पदार्थावर प्रक्रिया करण्यात आली असेल तर ;

(ग्) ज्यामुळे त्या पदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्या पदार्थाची प्रत यांच्यावर अपायकारक परिणाम होईल अशा तऱ्हेने जर त्या पदार्थात निकृष्ट दर्जाचे किंवा स्वस्त असे द्रव्य संपूर्णतः किंवा अंशतः घालण्यात आले असेल तर ;

(घ्) ज्यामुळे त्या पदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्या पदार्थाची प्रत यांच्यावर अपायकारक परिणाम होईल अशा प्रकारे जर त्या पदार्थातील एखादा घटक संपूर्णतः किंवा अंशतः काढून घेण्यात आला असेल तर ;

(ङ्) तो पदार्थ आरोग्यविघातक वातावरणात तयार करण्यात आल्यामुळे किंवा तशा वातावरणात आवेष्टित करण्यात आल्यामुळे किंवा तशा वातावरणात ठेवण्यात आल्यामुळे जर दूषित झाला असेल किंवा आरोग्यास अपायकारक झाला असेल तर ;

(च्) जर त्या पदार्थात संपूर्णतः किंवा अंशतः कोणतेही घाणेरडे, नासके, [5]* * * कुजके, सडलेले किंवा रोगग्रस्त अशा प्राण्यापासून किंवा वनस्पतीपासून बनलेले द्रव्य असेल, किंवा त्या पदार्थावर कीड पडलेली असेल किंवा तो मनुष्यप्राण्याने सेवन करण्यास अन्यथा अयोग्य असेल तर ;

---

१. १९७१ चा अधिनियम ४१, कलम २ द्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हा मजकूर गाळला (२६ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

२. १ जून, १९५५, भारताचे राजपत्र (इंग्रजी), भाग दोन, अनुभाग ३, पृष्ठ क्रमांक ८७४ पहा. अधिसूचना क्रमांक एस.आर.ओ., १०८५, दिनांक ९ मे, १९५५ पहा.

हा अधिनियम, १९६३ चा विनियम क्रमांक ६, कलम २ आणि अनुसूची १ यांद्वारे दादरा व नगर हवेली येथे, १९६३ चा विनियम क्रमांक ७, कलम ३ व अनुसूची १ यांद्वारे पांडेचरी येथे व, १९६३ चा विनियम क्रमांक ११, कलम ३ व अनुसूची यांद्वारे गोवा, दमण, दिव येथे लागू करण्यात आला व १९७२ चा अधिनियम २४ यांद्वारे नागालँडमधील कोहीमा व मोकोकचुंग जिल्ह्यांमध्ये लागू करण्यात आला.

३. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २ द्वारे खंड (एक) घातला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे खंड (एक) ला खंड (एक-क्) असा नवीन क्रमांक दिला. (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे "किळसवाणे" हा शब्द गाळला (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(छ) जर तो पदार्थ रोगग्रस्त प्राण्यांपासून मिळवलेला असेल तर;

(ज) ज्यामुळे तो पदार्थ आरोग्यास अपायकारक होईल असे कोणतेही विषारी द्रव्य किंवा अन्य घटकद्रव्य त्यात असेल तर;

(झ) जर त्या पदार्थाचे पात्र, ज्यामुळे त्यात ठेवलेला पदार्थ आरोग्यास अपायकारक होतो अशा कोणत्याही विषारी किंवा हानिकारक द्रव्यापासून संपूर्णतः किंवा अंशतः बनवलेले असेल तर;

[1][ (ञ) जर त्यांच्या संबंधात विहित केलेल्या रंजकद्रव्याव्यतिरिक्त इतर कोणतेही रंजकद्रव्य त्या पदार्थात वापरलेले असेल, किंवा पदार्थामध्ये वापरलेल्या विहित रंजकद्रव्याचे प्रमाण कमीजास्तपणाच्या विहित मर्यादेत नसेल तर;]

(ट) जर त्या पदार्थात कोणतेही मनाई केलेले रक्षकद्रव्य असेल किंवा अनुज्ञात रक्षकद्रव्य विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक प्रमाणात असेल तर;

[2][ (ठ) जर त्या पदार्थाची प्रत किंवा शुद्धता विहित मानकापेक्षा कमी असेल किंवा त्यामधील घटकद्रव्यांचे परिमाण कमीजास्तपणाच्या विहित मर्यादेत नसून, त्यामुळे तो पदार्थ आरोग्यास अपायकारक झाला असेल तर;]

[3][ (ड) जर त्या पदार्थाची प्रत किंवा शुद्धता विहित मानकापेक्षा कमी असेल किंवा त्यामधील घटकद्रव्यांचे परिमाण हे, कमीजास्तपणाच्या विहित मर्यादेत नसेल, परंतु, तो पदार्थ आरोग्यास अपायकारक झाला नसेल तर :

परंतु, मूलान्न असलेल्या एखाद्या अन्नपदार्थाची प्रत किंवा शुद्धता विहित मानकापेक्षा कमी झाली असेल किंवा त्यामधील घटकांचे परिमाण हे कमीजास्तपणाच्या विहित मर्यादेत नसून, दोन्ही बाबतीत केवळ नैसर्गिक कारणांमुळे किंवा मानवी शक्तीच्या आटोक्याबाहेरील कारणांमुळेच तसे घडले असेल तर, असा पदार्थ या उपखंडाच्या अर्थानुसार भेसळयुक्त असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.**—जर एक किंवा त्याहून अधिक मूलान्नपदार्थ एकत्र मिसळले असतील आणि अशा प्रकारे तयार झालेला अन्नपदार्थ,—

(क) त्यातील घटकद्रव्य सूचित करणाऱ्या नावाने साठविण्यात, विकण्यात किंवा वाटण्यात आला असेल; आणि

(ख) तो आरोग्यास अपायकारक नसेल तर;

—असा तयार पदार्थ या खंडाच्या अर्थानुसार भेसळयुक्त असल्याचे मानण्यात येणार नाही;]

(दोन) "केंद्रीय अन्न प्रयोगशाळा" याचा अर्थ, कलम ४ खाली स्थापन केलेली किंवा विनिर्दिष्ट केलेली कोणतीही प्रयोगशाळा किंवा संस्था, असा आहे;

(तीन) "समिती" याचा अर्थ, कलम ३ खाली घटीत केलेले केंद्रीय अन्न मानक समिती, असा आहे;

(चार) "संचालक, केंद्रीय अन्न प्रयोगशाळा" याचा अर्थ, केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे 'संचालक, केंद्रीय अन्न प्रयोगशाळा', म्हणून नियुक्ती केलेली व्यक्ती, असा आहे, व यामध्ये संचालकाची या अधिनियमाखालील सर्व किंवा त्यांपैकी कोणतीही कामे करण्यासाठी केंद्र शासनाने तशाच तऱ्हेने नियुक्ती केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे :

[3][परंतु, कोणत्याही अन्नपदार्थाची निर्मिती, आयात किंवा विक्री यामध्ये ज्या कोणत्याही व्यक्तीचा आर्थिक हितसंबंध असेल अशा व्यक्तीची या खंडाखाली संचालकपदी नियुक्ती करण्यात येणार नाही;]

[4][ (पाच) "अन्न" याचा अर्थ, औषधिद्रव्य व पाणी वगळता मनुष्यप्राण्याने सेवन करावयाचे अन्न किंवा पेय म्हणून वापरण्यात येणारा कोणताही पदार्थ, असा आहे व त्यात पुढील गोष्टींचा अंतर्भाव होतो :—

(क) सर्वसाधारणपणे जो पदार्थ मानवी अन्नाच्या घटनेत किंवा ते तयार केले जात असताना त्यात उतरतो किंवा वापरला जातो असा कोणताही पदार्थ,

(ख) कोणताही स्वादकारी पदार्थ किंवा मसाल्याचे पदार्थ, आणि

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २ द्वारे मूळ उपखंड (ञ) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ उपखंड (ठ) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(ग) जो पदार्थ, त्याचा वापर, स्वरूप, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्याची प्रत लक्षात घेऊन, केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अन्न म्हणून घोषित करील असा इतर कोणताही पदार्थ; ]

[१][ (सहा) "अन्न (आरोग्य) प्राधिकरण" याचा अर्थ, संचालक, वैद्यकीय व आरोग्य सेवा किंवा राज्यामधील आरोग्य प्रशासनाचा प्रभारी मुख्य अधिकारी, असा आहे,—मग तो कोणत्याही पदनामाने ओळखला जात असो—आणि यात, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे केंद्र शासन किंवा राज्य शासन याने, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्राच्या संबंधात या अधिनियमाखाली अन्न (आरोग्य) प्राधिकरणाच्या शक्तींचा वापर करण्यासाठी व त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी ज्यास शक्ती प्रदान केली असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो; ]

(सात) "स्थानिक क्षेत्र" याचा अर्थ, [२][केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने,] **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी स्थानिक क्षेत्र म्हणून घोषित केलेले कोणतेही नागरी किंवा ग्रामीण क्षेत्र, असा आहे;

(आठ) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ,—

(१) जे स्थानिक क्षेत्र,—

(क) नगरपालिका क्षेत्र म्हणून असेल त्याच्या बाबतीत, नगरपालिका मंडळ किंवा महानगरपालिका;

(ख) कटक म्हणून असेल त्याच्या बाबतीत, कटक प्राधिकरण;

(ग) अधिसूचित क्षेत्र म्हणून असेल त्याच्या बाबतीत, अधिसूचित क्षेत्र समिती,
—असा आहे;

(२) अन्य कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या बाबतीत, या अधिनियमान्वये [१][केंद्र शासन किंवा राज्य शासन] विहित करील असे प्राधिकरण, असा आहे;

[३][ (आठ-क) "स्थानिक (आरोग्य) प्राधिकरण" याचा स्थानिक क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, केंद्र शासन किंवा राज्य शासन याने, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पदनामाचा जो अधिकारी अशा क्षेत्रातील आरोग्य प्रशासनाचा प्रभारी म्हणून नियुक्त केला असेल तो अधिकारी, असा आहे;

(आठ-ख) "निर्मिती" यामध्ये, एखाद्या अन्नपदार्थाच्या निर्मितीला आनुषंगिक किंवा साह्यकारी असलेल्या कोणत्याही प्रक्रियेचा समावेश आहे; ]

(नऊ) "गैरछापाचा" म्हणजे,—

(क) एखादा दुसरा अन्नपदार्थ ज्या नावाखाली विकला जात असेल, त्या दुसऱ्या अन्न पदार्थाची तो नक्कल असेल किंवा त्याची प्रतिवस्तु म्हणून असेल किंवा ज्यामुळे फसवणूक होण्यासारखी आहे इतके त्या दुसऱ्या पदार्थाशी त्याचे साम्य असेल आणि त्याचे खरे स्वरूप व्यक्त होईल अशा प्रकारे स्पष्टपणे व ठळकपणे त्यावर लेबल लावलेले नसेल तर;

(ख) तो एखाद्या ठिकाणाचे किंवा देशाचे उत्पादन आहे असे खोटे निवेदन केलेले असेल तर;

(ग) दुसऱ्या अन्नपदार्थाच्या नावाखाली तो विकला जात असेल तर;

(घ) तो पदार्थ खराब झाला आहे ही वस्तुस्थिती लपून राहील अशा प्रकारे त्याला रंग किंवा स्वाद देण्यात आला असेल अथवा त्यावर पुट चढवण्यात आले असेल, त्याला पावडर लावली असेल किंवा त्याला पॉलीश केले असेल अथवा तो पदार्थ वस्तुतः आहे त्यापेक्षा अधिक चांगला किंवा अधिक किंमती दिसेल अशाप्रकारे तयार केला असेल तर;

(ङ) लेबलावर किंवा अन्यत्र त्याच्याबाबत खोटे दावे सांगणारी विधाने केलेली असतील तर;

(च) निर्माणकाने किंवा उत्पादकाने किंवा त्याच्या सूचनेवरून तयार किंवा सीलबंद केलेल्या आणि त्याचे नाव व पत्ता असलेल्या आवेष्टनांमध्ये तो विकला जात असताना, प्रत्येक आवेष्टनाच्या बाहेरील बाजूवर, त्यातील पदार्थाचा तपशील, या अधिनियमान्वये कमीजास्तपणाबाबत विहित केलेल्या मर्यादेनुसार ठळकपणे व अचूकपणे नमूद केलेला नसेल तर;

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम ४९, कलम २ द्वारे 'राज्य शासन' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ मार्च, १९७५ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २ द्वारे घातले (१ एप्रिल १९७६ रोजी व तेव्हापासून).

(छ) एखाद्या महत्त्वाच्या तपशिलाबाबत खोटे किंवा दिशाभूल करणारे असे त्या पदार्थाच्या घटकद्रव्यांसंबंधीचे किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या द्रव्यांसंबंधीचे कोणतेही विधान, आकृती किंवा चिन्ह त्याच्या आवेष्टनावर किंवा आवेष्टनावरील लेबलावर असेल; किंवा ते आवेष्टन त्यातील वस्तूबाबत अन्यप्रकारे फसवणूक करणारे असेल तर;

(ज) त्या पदार्थाच्या आवेष्टनावर किंवा आवेष्टनावरील लेबलावर त्या पदार्थाचा निर्माणक किंवा उत्पादक म्हणून कपोलकल्पित इसमाचे किंवा कंपनीचे नाव असेल तर;

(झ) तो विशेष पथ्याहार म्हणून उपयोगाचा असल्याचे अभिप्रेत असेल किंवा तसे अभिवेदन करण्यात आले असेल, परंतु, अशा कामी तो कसा उपयुक्त आहे यासंबंधी त्याच्या खरेदीदाराला पुरेशी माहिती व्हावी म्हणून त्यामधील जीवनसत्त्वे, खनिजे किंवा इतर पथ्यकर गुणधर्म यांविषयी विहित केली जाईल अशी माहिती त्याच्या लेबलावर नसेल तर ;

(ञ) वस्तुस्थिती जाहीर करणारे लेबल न लावता अथवा या अधिनियमाने किंवा त्याखाली केलेल्या नियमांनी आवश्यक केलेल्या गोष्टींचा भंग करून जर कोणताही कृत्रिम स्वाद, कृत्रिम रंग किंवा रासायनिक रक्षकद्रव्य त्यात घातलेले असेल तर;

(ट) उक्त अधिनियम किंवा त्याअन्वये केलेले नियम यांनी आवश्यक केल्यानुसार त्यावर लेबल लावलेले नसेल तर,

—तो अन्नपदार्थ "गैरछापाचा" असल्याचे मानले जाईल;

(दहा) "आवेष्टन" याचा अर्थ, ज्यामध्ये अन्नपदार्थ ठेवलेला असेल किंवा आवेष्टिलेला असेल अशी पेटी, बाटली, करंडक, डबा, पिंप, खोका, पात्र, गोणी, पिशवी, वेष्टन किंवा अशी अन्य वस्तू, असा आहे ;

(अकरा) "वास्तू" याचा अर्थ, जेथे कोणताही अन्नपदार्थ विकला जाईल, विक्रीसाठी त्याची निर्मिती केली जाईल किंवा विक्रीसाठी साठवला जाईल असे कोणतेही दुकान, ठेला किंवा ठिकाण, असा आहे ;

(बारा) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

[1][ (बारा-क) "मूलान्न" याचा अर्थ, निसर्गावस्थेतील शेतकी किंवा बागायती मालाच्या स्वरूपातील कोणताही अन्नपदार्थ, असा आहे ; ]

(तेरा) "विक्री" याचे व्याकरणिक रूपभेद आणि सजातीय शब्दप्रयोग यांसुद्धा त्याचा अर्थ, मनुष्यप्राण्याने सेवन करण्यासाठी किंवा वापरण्यासाठी अथवा विश्लेषणाच्या कामासाठी केलेली कोणत्याही अन्नपदार्थाची विक्री, असा आहे—मग ती रोख असो, उधारीवर असो वा कशाच्यातरी बदल्यात असो, तसेच घाऊक असो वा किरकोळ असो,—आणि त्यामध्ये विक्रीचा करार करणे विक्रीचा प्रस्ताव मांडणे, असा कोणताही पदार्थ विक्रीकरता मांडणे किंवा तो विक्रीसाठी जवळ बाळगणे यांचा समावेश आहे, आणि त्याचप्रमाणे त्यामध्ये असा कोणताही पदार्थ विकण्याच्या प्रयत्नाचाही समावेश आहे ;

(चौदा) "नमुना" याचा अर्थ, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या उपबंधान्वये कोणत्याही अन्नपदार्थाचा घेतलेला नमुना, असा आहे ;

(पंधरा) एखाद्या अन्नपदार्थाच्या संबंधात जेव्हा "अपथ्यकर" किंवा "अपायकारक" हे शब्द वापरले जातील तेव्हा त्यांचा अर्थ, तो पदार्थ अनुक्रमे आरोग्याला घातक किंवा मानवी उपयोगाला प्रतिकूल आहे, असा होतो.

[2][अर्थ लावण्याचा नियम. २क. जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अंमलात नसलेल्या कायद्यांचा या अधिनियमामध्ये जो कोणताही उल्लेख असेल त्याचा त्या राज्याच्या संबंधातील अर्थ, त्या राज्यात कोणताही समनुरुप कायदा अंमलात असल्यास, त्याचा उल्लेख म्हणून लावण्यात येईल.]

## केंद्रीय अन्न मानक समिती व केंद्रीय अन्न प्रयोगशाळा

केंद्रीय अन्न मानक समिति. ३. (१) या अधिनियमाचा प्रारंभ झाल्यानंतर होईल तितक्या लवकर केंद्र शासन 'केंद्रीय अन्न मानक समिति,' म्हणून संबोधली जाणारी अशी एक समिती, या अधिनियमाच्या प्रशासनामधून उद्भवणाऱ्या बाबींवर केंद्र शासनाला व राज्य शासनांना सल्ला देण्याकरता आणि या अधिनियमान्वये तिला नेमून दिलेली इतर कार्ये पार पाडण्याकरता घटित करील.

(२) पुढील सदस्य मिळून समिती तयार होईल, ते असे :—

(क) महासंचालक, आरोग्य सेवा, पदसिद्ध—हा अध्यक्ष असेल ;

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९७१ चा अधिनियम ४१, कलम ३ द्वारे घातले (२६ जानेवारी, १९७२ रोजी व तेव्हापासून).

[१][(ख) संचालक, केंद्रीय अन्न प्रयोगशाळा, किंवा एकाहून अधिक केंद्रीय अन्न प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या असतील त्याबाबतीत, अशा प्रयोगशाळांचे संचालक, पदसिद्ध ;]

(ग) केंद्र शासनाने नामनियुक्त केलेले दोन तज्ज्ञ ;

[२][(घ) केंद्र शासनाने नामनियुक्त केलेला असा, केंद्रीय अन्न व कृषि मंत्रालयातील अन्न व कृषि या विभागांचा एकेक प्रतिनिधी आणि केंद्रीय वाणिज्य, संरक्षण, उद्योग व पुरवठा व रेल्वे या मंत्रालयांचा तसाच एकेक प्रतिनिधी; ]

(ङ) प्रत्येक [३] * * * राज्याच्या शासनाने नामनियुक्त केलेला प्रत्येकी एकेक प्रतिनिधी;

(च) [४][संघ राज्यक्षेत्रांचे] प्रतिनिधित्व करण्याकरिता केंद्र शासनाने नामनियुक्त केलेले दोन प्रतिनिधी ;

[२][(छ) कृषिविषयक, वाणिज्यविषयक व औद्योगिक हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करण्याकरिता केंद्र शासनाने नामनियुक्त केलेला प्रत्येकी एकेक प्रतिनिधी ;

(छ छ) ग्राहकांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करण्याकरिता केंद्र शासनाने नामनियुक्त केलेले पाच प्रतिनिधि—त्यांपैकी एक हॉटेल व्यवसायातील असेल ; ]

(ज) भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने नामनियुक्त केलेला वैद्यकीय पेशाचा एक प्रतिनिधी ;

१९५२ चा ३६. [५][(झ) भारतीय मानक संस्था (प्रमाणन चिन्हे) अधिनियम, १९५२, कलम २ च्या खंड (ङ) मध्ये निर्देशिलेल्या भारतीय मानक संस्थेने नामनियुक्त केलेला एक प्रतिनिधी.]

(३) पोटकलम (२) चे खंड (ग), (घ), (ङ), (च), [५][ [२][(छ), (छछ) ], (ज) व (झ)] यांमध्ये निर्देशिलेले समितीचे सदस्य तीन वर्षेपर्यंत,—तत्पूर्वी त्यांच्या जागा राजीनाम्यामुळे, मृत्यूमुळे किंवा अन्य प्रकारे रिकाम्या झाल्या नाहीत तर,—पद धारण करण्यास हक्कदार असतील व पुन्हा नामनियुक्त होण्यास पात्र असतील.

(४) समितीत कोणतीही जागा रिकामी असली तरीही समितीची कामे करता येतील.

(५) समितीला योग्य वाटतील अशा उपसमित्या तिला नियुक्त करता येतील, तसेच समितीकडून त्यांच्याकडे सोपवल्या जातील अशा शक्ती, समितीने कोणत्याही शर्ती लादल्यास त्यांच्या अधीनतेने वापरण्यासाठी व तशी कामे तशा शर्तींच्या अधीनतेने करण्यासाठी समितीला त्या उपसमित्यांवर समितीचे सदस्य नसलेल्या व्यक्तींची नियुक्ती करता येईल.

(६) समितीला आपल्या स्वत:च्या कार्यपद्धतीचे आणि आपल्या कामकाजाच्या चालनाचे विनियमन करण्यासाठी, केंद्र शासनाची पूर्वमान्यता घेऊन, उपविधी करता येतील.

[६][३क. (१) केंद्र शासन समितीच्या सचिवाची नियुक्ती करील, व समितीच्या नियंत्रणाखाली व मार्गदर्शनाखाली तो समितीकडून विहित करण्यात किंवा त्याच्याकडे सोपवण्यात येतील त्याप्रमाणे तशा शक्तींचा वापर करील आणि तशी कर्तव्ये पार पाडील. सचिव व इतर कर्मचारीवर्ग यांची नियुक्ती.

(२) केंद्र शासन, समितीकरिता त्या शासनास आवश्यक वाटेल असा लिपिकवर्ग व इतर कर्मचारीवर्ग पुरवील.]

४. [७][(१) हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेले कोणतेही नियम याद्वारे केंद्रीय अन्न प्रयोगशाळेकडे सोपविलेली कार्ये पार पाडण्याकरिता केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे एक किंवा अनेक केंद्रीय अन्न प्रयोगशाळा स्थापन करील : केंद्रीय अन्न प्रयोगशाळा.

परंतु, केंद्र शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ कोणतीही प्रयोगशाळा किंवा संस्था ही केंद्रीय अन्न प्रयोगशाळा असल्याचे विनिर्दिष्टही करता येईल.]

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. विधि अनुकूलन (क्र. ३) आदेश, १९५६ द्वारे " भाग क राज्य व भाग ख " हे शब्द गाळले.

४. वरील अनुकलन आदेशाद्वारे ' भाग ग राज्ये ' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

५. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ३ द्वारे घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

७. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(२) समितीबरोबर विचारविनिमय करून केंद्र शासनाला पुढील गोष्टी विहित करणारे नियम करता येतील :—

[1][(क) केंद्रीय अन्न प्रयोगशाळेची कार्ये व अशी कार्ये जेथे पार पाडता येतील ते स्थानिक क्षेत्र किंवा क्षेत्रे ;]

(ख) अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी किंवा चाचण्यांसाठी उक्त प्रयोगशाळेकडे सादर करण्याची कार्यपद्धती, त्यांवर प्रयोगशाळेने द्यावयाच्या अभिप्रायांचे नमुने आणि अशा अभिप्रायांबाबत द्यावयाची फी ;

(ग) उक्त प्रयोगशाळेला तिची कार्ये पार पाडता यावीत या दृष्टीने आवश्यक व इष्ट असतील अशा इतर बाबी.

## अन्नविषयक सर्वसाधारण उपबंध

विवक्षित अन्नपदार्थांच्या आयातीस बंदी.

५. कोणत्याही व्यक्तीला,—

(एक) कोणतेही भेसळयुक्त अन्न ;

(दोन) कोणतेही गैरछापाचे अन्न ;

(तीन) ज्या कोणत्याही अन्नपदार्थाच्या आयातीसाठी लायसन विहित करण्यात आले असेल त्याच्या बाबतीत, लायसनाच्या शर्तींचे अनुसरण केल्याखेरीज, कोणताही अन्नपदार्थ; आणि

(चार) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करून कोणताही अन्नपदार्थ ;

—भारतात आयात करता येणार नाही.

सागरी सीमाशुल्क कायदा लागू करणे आणि सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या शक्ती.

६. (१) सागरी सीमाशुल्काच्या संबंधात आणि तसेच सागरी सीमाशुल्क अधिनियम, १८७८, कलम १८ अन्वये ज्याच्या आयातीवर बंदी घातली आहे त्या मालाच्या संबंधात त्या त्या काळी अंमलात असलेला कायदा, या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये आयात करण्यास बंदी घातलेल्या अन्नपदार्थांच्या बाबतीत, या अधिनियमाच्या कलम १६ च्या उपबंधांच्या अधीनतेने लागू होईल, आणि सीमाशुल्क अधिकारी आणि त्या अधिनियमाद्वारे सीमाशुल्क समाहारकाला व इतर सीमाशुल्क अधिकाऱ्यांना नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्या अधिनियमान्वये शक्ती प्रदान झालेले अधिकारी यांना पूर्वोक्त अशा मालाच्या बाबतीत त्या त्या काळी ज्या शक्ती असतील त्याच त्यांना तशा अन्नपदार्थांच्या बाबतीत असतील. १८७८ चा ८.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधांना बाध न येता, सीमाशुल्क समाहारकाला किंवा केंद्र शासनाने या संबंधात प्राधिकृत केलेल्या कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला, आयात केलेल्या एखाद्या पुडक्यात या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये आयात करण्यास बंदी असलेला कोणताही अन्नपदार्थ आहे असा संशय आल्यास, त्याला ते पुडके अडकवून ठेवता येईल, आणि ते अडकवून ठेवल्याचे वृत्त तो तात्काळ संचालक, केंद्रीय अन्न प्रयोगशाळा याला कळवील आणि त्याने आवश्यक केल्यास, ते पुडके किंवा त्यातील कोणत्याही संशयित अन्नपदार्थाचे नमुने उक्त प्रयोगशाळेकडे पाठवील.

विवक्षित अन्नपदार्थांची निर्मिती, विक्री, इत्यादींस बंदी.

७. कोणत्याही व्यक्तीला स्वतःला,—

(एक) कोणत्याही भेसळयुक्त अन्नाची ;

(दोन) कोणत्याही गैरछापाच्या अन्नाची ;

(तीन) ज्या अन्नपदार्थाच्या विक्रीसाठी लायसन विहित केले असेल त्याच्या बाबतीत, लायसनाच्या शर्तींचे अनुसरण केल्याखेरीज, त्या अन्नपदार्थाची ;

(चार) [2][सार्वजनिक आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने] ज्या अन्नपदार्थाच्या विक्रीला अन्न (आरोग्य), प्राधिकरणाने त्या त्या काळी बंदी केली असेल अशा कोणत्याही अन्नपदार्थाची ; [3]* * *

(पाच) या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करून कोणत्याही अन्नपदार्थाची; [4][किंवा]

[4][(सहा) कोणत्याही भेसळकारी पदार्थाची,]

—विक्रीसाठी निर्मिती करता येणार नाही, त्याची साठवण करता येणार नाही किंवा तो विकता येणार नाही किंवा वितरित करता येणार नाही अथवा स्वतःच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी तसे करवता येणार नाही.

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ५ द्वारे मूळ खंड (क) ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ४ द्वारे विवक्षित मजकुराऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ६ द्वारे "किंवा" हा शब्द गाळला (१ एप्रि रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनि

[१][स्पष्टीकरण.—जर एखाद्या व्यक्तीने कोणतेही भेसळयुक्त अन्न अथवा गैरछापाचे अन्न अथवा खंड (तीन), किंवा खंड (चार) किंवा खंड (पाच) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारचा कोणताही अन्नपदार्थ यांचा, त्यापासून कोणत्याही अन्नपदार्थांची विक्रीसाठी निर्मिती करण्याकरिता साठा केला तर, ती व्यक्ती तशा प्रकारच्या अन्नाचा साठा करीत आहे असे या कलमाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.]

## अन्नाचे विश्लेषण

[२][८. केंद्र शासन किंवा राज्य शासन, विहित अर्हता असणाऱ्या ज्या व्यक्ती त्याला योग्य वाटतील त्यांची, केंद्र शासन किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासन त्यांना नेमून देईल अशा स्थानिक क्षेत्रांकरिता शासकीय विश्लेषक म्हणून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्ती करू शकेल :

परंतु, कोणत्याही अन्नपदार्थाची निर्मिती, आयात किंवा विक्री यामध्ये कोणताही आर्थिक हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला या कलमान्वये शासकीय विश्लेषक म्हणून नियुक्त केले जाणार नाही :

[३][परंतु आणखी असे की, वेगवेगळ्या प्रकारच्या अन्नपदार्थांसाठी वेगवेगळे शासकीय विश्लेषक नियुक्त करता येतील.]

९. (१) केंद्र शासन किंवा राज्य शासन, विहित अर्हता असणाऱ्या ज्या व्यक्ती त्यास योग्य वाटतील त्यांना, केंद्र शासन किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य शासन नेमून देईल अशा स्थानिक क्षेत्रांकरिता अन्न निरीक्षक म्हणून शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियुक्त करू शकेल :

परंतु, कोणत्याही अन्नपदार्थाची निर्मिती, आयात किंवा विक्री यामध्ये कोणताही आर्थिक हितसंबंध असलेल्या व्यक्तीला या कलमान्वये अन्न निरीक्षक म्हणून नियुक्त केले जाणार नाही.

१८६० चा४५. (२) प्रत्येक अन्न निरीक्षक भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानले जाईल व त्याची नियुक्ती करणारे शासन यासंबंधात विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाला तो, पदपरत्वे दुय्यम असेल.]

१०. (१) अन्न निरीक्षकाला पुढील गोष्टी करण्याची शक्ती असेल :—

(क) कोणत्याही अन्नपदार्थाचे नमुने,—

(एक) असा पदार्थ विकणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून घेणे;

(दोन) असा पदार्थ खरेदीदाराकडे किंवा मालप्रेषितीकडे घेऊन जात असलेल्या, सुपूर्द करत असलेल्या किंवा सुपूर्द करण्याची तयारी करीत असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून घेणे;

(तीन) असा कोणताही पदार्थ मालप्रेषितीकडे सुपूर्द झाल्यानंतर त्याच्याकडून घेणे; आणि

(ख) ज्या स्थानिक क्षेत्रातून असा नमुना घेतला असेल त्याच्या शासकीय विश्लेषकाकडे असा नमुना विश्लेषणाकरता पाठविणे ;

[४][(ग) संबंधित स्थानिक क्षेत्रात अधिकारिता असणाऱ्या स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेने किंवा अन्न (आरोग्य) प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेने सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी एखाद्या अन्नपदार्थाच्या विक्रीस बंदी करणे.]

[५][स्पष्टीकरण.—खंड (क) चा उपखंड (तीन) याच्या प्रयोजनार्थ, "मालप्रेषिती" यामध्ये, जी व्यक्ती कोणताही अन्नपदार्थ तिच्या स्वतःच्या उपयोगासाठी खरेदी करील किंवा मिळवील अशा व्यक्तीचा समावेश होत नाही.]

[४][(२) कोणत्याही अन्न निरीक्षकास, जेथे कोणत्याही अन्नपदार्थाची निर्मिती केली जाते, किंवा तो विक्रीसाठी साठवण्यात येतो, किंवा विक्रीसाठी ठेवावयाच्या इतर कोणत्याही अन्नपदार्थाची निर्मिती करण्यासाठी साठवण्यात येतो, किंवा विक्रीसाठी ठेवण्यात येतो, किंवा मांडण्यात येतो किंवा जेथे कोणत्याही भेसळकारी पदार्थाची निर्मिती करण्यात येते, किंवा तो ठेवण्यात येतो, अशा कोणत्याही ठिकाणी प्रवेश करून पाहणी करता येईल व विश्लेषणाकरिता अशा अन्नपदार्थाचे किंवा भेसळकारी पदार्थाचे नमुने घेता येतील :

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ६ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ५ द्वारे कलमे ८ व ९ यांऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ७ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

परंतु, मुलतःच्या स्वरूपातील कोणताही अन्नपदार्थ जर असे अन्न म्हणून विकण्याचा उद्देश नसेल तर, या कलमान्वये त्याचा कोणताही नमुना घेण्यात येणार नाही.]

(३) पोटकलम (१) चा खंड (क) किंवा पोटकलम (२) खाली कोणताही नमुना घेण्यात आला असेल त्याबाबतीत, तो पदार्थ लोकांना नेहमी ज्या दराने विकला जातो त्या दराने काढलेली त्याची किंमत तो ज्या व्यक्तीकडून घेण्यात आला असेल तिला देण्यात येईल.

(४) अन्न म्हणून वापरण्यासाठी उद्देशित असलेला कोणताही पदार्थ भेसळयुक्त किंवा गैरछापाचा आहे असे कोणत्याही अन्न निरीक्षकास आढळून आले तर, यात यापुढे दिलेली कार्यवाही करता यावी म्हणून त्यास असा पदार्थ जप्त करून घेऊन जाता येईल किंवा विक्रेत्याच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवता येईल; [३][आणि दोन्ही बाबतीत, तो अशा पदार्थाचा नमुना घेऊन तो विश्लेषणाकरिता शासकीय विश्लेषकाकडे सादर करील] :

[२][परंतु, अन्न निरीक्षक असा पदार्थ विक्रेत्याच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवील तेव्हा, विक्रेत्याला तो अशा पदार्थाच्या किंमतीइतक्या रकमेचे बंधपत्र, अन्न निरीक्षकाला योग्य वाटेल त्याप्रमाणे एका किंवा अधिक जामीनदारांसह निष्पादित करून देण्यास फर्मावू शकेल व तदनुसार विक्रेत्याला तसे बंधपत्र निष्पादित करून द्यावे लागेल.]

[२][ (४क) पोटकलम (४) खाली जप्त केलेला अन्नपदार्थ नाशिवंत स्वरूपाचा असेल आणि असा अन्नपदार्थ इतका खराब झाला आहे की, माणसांनी खाण्यासाठी तो वापरण्यास अयोग्य आहे अशी स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाची खात्री पटली तर, विक्रेत्याला लेखी नोटीस देऊन नंतर उक्त प्राधिकरणास तो पदार्थ नष्ट करण्याची व्यवस्था करता येईल.]

(५) या कलमान्वये प्रदान केलेल्या शक्तीमध्ये, ज्यात कोणताही अन्नपदार्थ असेल असे कोणतेही पुडके फोडून उघडण्याची किंवा जेथे कोणताही अन्नपदार्थ विक्रीसाठी ठेवला असेल अशा कोणत्याही वास्तूचा दरवाजा फोडून उघडण्याची शक्ती अंतर्भूत आहे :

[२][परंतु, पुडके किंवा दरवाजा फोडून उघडण्याच्या शक्तीचा वापर करावयाचा झाल्यास, पुडक्याच मालक अथवा जिच्या ताब्यात पुडके असेल किंवा, प्रकरणपरत्वे, जिच्या वहिवाटीत ती वास्तू असेल अशी अन्य कोणतीही व्यक्ती त्या वास्तूमध्ये उपस्थित असून तिला पुडके किंवा दरवाजा उघडण्यास सांगितले असता तसे करण्यास तिने नकार दिल्यानंतरच आणि दोन्ही बाबतीत, तसे करण्याबद्दलची कारणे नमूद करून नंतरच असा वापर करण्यात येईल :]

परंतु आणखी असे की, या कलमान्वये एखाद्या वास्तूमध्ये प्रवेश करून पाहणी करण्याच्या शक्तीचा वापर करताना अन्न निरीक्षक, [३][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] याअन्वये काढलेल्या झडती वॉरंटाची अंमलबजावणी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने एखाद्या वास्तूची झडती अथवा तपासणी करण्यासंबंधी त्या संहितेत जे उपबंध असतील त्यांचे होईल तेथवर अनुसरण करील. १९७४ चा २.

(६) [३][एखाद्या प्रकारच्या अन्नपदार्थाचा निर्माणक, वितरक किंवा व्यापारी याच्या कब्जात, अथवा त्या नात्याने त्याने ताब्यात ठेवलेल्यांपैकी कोणत्याही वास्तूमध्ये कोणताही भेसळकारी पदार्थ सापडला] आणि तो पदार्थ आपल्या कब्जात कसा याबद्दल तो अन्न निरीक्षकाचे समाधान होईल अशा प्रकारे खुलासा करू शकला नाही तर, तो पदार्थ [२][आणि त्याच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असल्याचे आढळलेली जी कोणतीही हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज या अधिनियमाखालील कोणतेही अन्वेषण किंवा कार्यवाही यासाठी उपयुक्त होऊ शकतील किंवा संबद्ध ठरू शकतील ती अन्न निरीक्षकाला जप्त करता येतील] आणि [३][अशा भेसळकारी पदार्थाचा नमुना] शासकीय विश्लेषकाकडे विश्लेषणासाठी सादर करता येईल :

[२][परंतु, अशी कोणतीही हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज अन्न निरीक्षकाला, तो ज्या प्राधिकरणास पदपरत्वे दुय्यम असेल अशा प्राधिकरणाच्या पूर्वमान्यतेखेरीज जप्त करता येणार नाहीत.]

---

१. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ६ द्वारे घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ८ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(७) जेव्हा अन्न निरीक्षक पोटकलम (१) चा खंड (क्) किंवा पोटकलम (२) किंवा पोटकलम (४) किंवा पोटकलम (६) अन्वये कोणतीही कारवाई करील तेव्हा, तो [१][एका व्यक्तीला किंवा अधिक व्यक्तींना अशी कारवाई केली जात असताना उपस्थित रहावयास सांगेल व तिची किंवा त्यांची सही घेईल].

[२][ (७क्) पोटकलम (६) अन्वये कोणतीही हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज जप्त केले जातील त्या बाबतीत, ते जप्त केल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त तीस दिवसांच्या आत, अन्न निरीक्षक, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्या व्यक्तीने प्रमाणित केल्याप्रमाणे त्याच्या नकला किंवा त्यांतील उतारे काढून घेऊन नंतर, ज्या व्यक्तीकडून ते जप्त करण्यात आले होते त्या व्यक्तीला ते परत करील :

परंतु, अशा व्यक्तीने अशा प्रकारे प्रमाणन करण्यास नकार दिला असेल आणि या अधिनियमाखाली त्या व्यक्तीच्या विरुद्ध खटला भरण्यात आला असेल तर, अशी हिशेबपुस्तके किंवा इतर दस्तऐवज, न्यायालयाने प्रमाणित केल्याप्रमाणे त्यांच्या नकला किंवा त्यांतील उतारे काढून घेतल्यानंतरच परत करण्यात येतील.

(७ख्) पोटकलम (६) खाली कोणताही भेसळकारी पदार्थ जप्त केला असेल त्या बाबतीत, असा भेसळकारी पदार्थ भेसळ करण्यासाठी वापरण्याचा उद्देश नव्हता हे शाबीत करण्याचा भार असा भेसळकारी पदार्थ जिच्या ताब्यातून जप्त करण्यात आला असेल अशा व्यक्तीवर असेल.]

१९७४ चा २. (८) कोणताही अन्न निरीक्षक, ज्या व्यक्तीकडून नमुना घेतला असेल किंवा अन्नपदार्थ जप्त केला असेल तिचे खरे नाव व राहण्याचे ठिकाण यांची खातरजमा करण्यासाठी [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम ४२] खाली पोलीस अधिकाऱ्याला असलेल्या शक्तींचा वापर करू शकेल.

(९) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये शक्तींचा वापर करणारा जो कोणताही अन्न निरीक्षक,—

(क्) त्रास देण्याच्या हेतूने आणि संशयाला रास्त आधार नसताना कोणताही अन्नपदार्थ [२][किंवा भेसळकारी पदार्थ] जप्त करील; किंवा

(ख्) कोणत्याही व्यक्तीची हानी करणारी अन्य एखादी कृती आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी आवश्यक आहे असे समजण्यास कारण नसताना अशी कृती करील,

—तो या अधिनियमान्वये गुन्ह्याबद्दल दोषी ठरेल, व अशा गुन्ह्याबद्दल तो द्रव्यदंडास पात्र होईल [३][आणि तो द्रव्यदंड ५०० रु. पेक्षा कमी असणार नाही, परंतु १,००० रु. पर्यंत असू शकेल].

**अन्न निरीक्षकांनी अनुसरावयाची कार्यपद्धती.**

११. [४][ (१) जेव्हा एखादा अन्न निरीक्षक विश्लेषणाकरिता अन्नाचा नमुना घेईल तेव्हा, तो,—

(क्) ज्या व्यक्तीकडून त्याने नमुना घेतला असेल त्या व्यक्तीला आणि जिचे नाव, पत्ता व इतर तपशील कलम १४-क खाली उघड करण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती असल्यास तिला त्या अन्नपदार्थाचे तसे विश्लेषण करण्याचा आपला इरादा असल्याची लेखी नोटीस तेथल्या तेथे देईल;

(ख्) या अधिनियमाखालील नियमांद्वारे उपबंधित केली असतील अशी विशेष प्रकरणे खेरीजकरून इतर बाबतीत, त्या नमुन्याची तेथल्या तेथे तीन भागांमध्ये विभागणी करील आणि प्रत्येक भाग चिन्हांकित करून पदार्थाच्या स्वरूपानुसार शक्य असेल त्याप्रमाणे मोहोरबंद करील किंवा बांधून ठेवील व तो नमुना ज्या व्यक्तीकडून घेण्यात आला असेल त्या व्यक्तीची सही किंवा अंगठ्याचा ठसा, विहित करण्यात येईल अशा जागी व तशा रीतीने घेईल :

परंतु, जेव्हा अशी व्यक्ती सही करण्यास किंवा अंगठ्याचा ठसा लावण्यास नकार देईल तेव्हा, अन्न निरीक्षक एका किंवा अधिक साक्षीदारास बोलावील आणि अशा व्यक्तीची सही किंवा अंगठ्याचा ठसा याऐवजी, प्रकरणपरत्वे, त्या साक्षीदाराची किंवा साक्षीदारांची सही अथवा अंगठ्याचा ठसा घेईल;

(ग्) (एक) त्या भागांपैकी एक भाग, स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणास तसे कळवून शासकीय विश्लेषकाकडे विश्लेषणाकरिता पाठवील; आणि

(दोन) राहिलेले दोन भाग या कलमाचे पोटकलम (२) आणि कलम १३ ची पोटकलमे (२क्) व (२ङ्) यांच्या प्रयोजनार्थ स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडे पाठवील.

---

१. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ६ द्वारे विशिष्ट शब्दांऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ८ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(२) जर पोटकलम (१), खंड (ग) च्या उपखंड (एक) खाली शासकीय विश्लेषकाकडे पाठविलेल्या नमुन्याचा भाग गहाळ झाला किंवा खराब झाला तर, स्थानिक (आरोग्य) प्राधिकरण, उक्त खंड (ग), उपखंड (दोन) खाली आपणाकडे पाठवण्यात आलेल्या नमुन्याच्या भागांपैकी एक भाग, शासकीय विश्लेषकाने किंवा अन्न निरीक्षकाने त्याच्याकडे केलेल्या मागणीवरून विश्लेषणाकरिता विश्लेषकाकडे पाठवील.]

(३) जेव्हा कलम १०, पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली कोणत्याही अन्नपदार्थाचा [१][किंवा भेसळकारी पदार्थाचा] नमुना घेण्यात आला असेल तेव्हा, नमुना चाचणीसाठी विहित करण्यात आलेल्या नियमांनुसार [२][अन्न निरीक्षक, लगतनंतरच्या कामाच्या दिवशी अन्नपदार्थाचा किंवा भेसळकारी पदार्थाचा किंवा, प्रकरणपरत्वे, दोन्हींचा नमुना]. संबंधित स्थानिक क्षेत्राच्या शासकीय विश्लेषकाकडे पाठवील.

[२][ (४) कलम १०, पोटकलम (४) खाली जप्त केलेला अन्नपदार्थ त्या कलमाच्या पोटकलम (४क) खाली नष्ट करण्यात आला नाही तर, तो अन्नपदार्थ, आणि त्या कलमाच्या पोटकलम (६) खाली जप्त केलेला कोणताही भेसळकारी पदार्थ, शक्य तितक्या लवकर व कोणत्याही परिस्थितीत शासकीय विश्लेषकाकडून अभिप्राय आल्यानंतर जास्तीत जास्त सात दिवसांच्या मुदतीपर्यंत दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात येईल :]

परंतु [३][ * * * ], ज्या व्यक्तीकडून कोणताही अन्नपदार्थ जप्त करण्यात आला असेल तिने यासंबंधात दंडाधिकाऱ्याकडे अर्ज केल्यास, दंडाधिकारी लेखी आदेशाद्वारे, अन्न निरीक्षकाला अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत असा अन्नपदार्थ आपणापुढे सादर करण्याचा निदेश देऊ शकेल.

[२][ (५) आपणास आवश्यक वाटेल असा पुरावा घेतल्यानंतर, जर दंडाधिकाऱ्यास,—

(क) पोटकलम (४) अन्वये त्याच्यापुढे सादर करण्यात आलेला अन्नपदार्थ भेसळयुक्त किंवा गैरछापाचा आहे असे वाटले तर, दंडाधिकारी पुढीलप्रमाणे आदेश देऊ शकेल :—

(एक) तो समपहृत करून केंद्र शासनाकडे, राज्य शासनाकडे, किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाकडे जमा करण्यात यावा; किंवा

(दोन) अन्नपदार्थ म्हणून त्याचा वापर होऊ नये म्हणून मालकाच्या खर्चाने किंवा ज्या व्यक्तीकडून तो जप्त करण्यात आला असेल त्या व्यक्तीच्या खर्चाने नष्ट करण्यात यावा; किंवा

(तीन) तो पदार्थ त्याच्या फसव्या नावाने विक्रीकरता पुन्हा ठेवता येणार नाही किंवा अन्न म्हणून वापरता येणार नाही अशा प्रकारे त्याची विल्हेवाट लावण्यात यावी; किंवा

(चार) मालकाने जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र निष्पादित केल्यानंतर तो योग्य नावाने विकण्याकरता, अथवा त्याचे पुनःसंस्करण केल्यास तो माणसांनी उपयोग करण्यायोग्य अशा विहित दर्जानुरूप करता येण्यासारखा आहे अशी दंडाधिकाऱ्याची खात्री पटली तर, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली असे संस्करण केल्यानंतर विकण्याकरता मालकाला परत देण्यात यावा;

(ख) कलम १०, पोटकलम (६) खाली जप्त केलेला व त्याच्याकडे हजर करण्यात आलेला भेसळयुक्त पदार्थ हा, दर्शनीच, भेसळ करण्यासाठी वापरता येईल अशा प्रकारचा आहे असे त्याला वाटले आणि आपल्याकडे त्याचा ताबा कसा याबद्दल निर्माणक, वितरक किंवा, प्रकरणपरत्वे, व्यापारी समाधानकारकरीत्या खुलासा करू शकला नाही तर, दंडाधिकारी, तो पदार्थ समपहृत करण्यात येऊन केंद्र शासनाकडे, राज्य शासनाकडे, किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाकडे जमा करण्यात यावा, असा आदेश देऊ शकेल.]

(६) [२][असा कोणताही,—

(क) अन्नपदार्थ भेसळयुक्त नाही; किंवा

(ख) भेसळकारी पदार्थ असल्याचे वाटणारा पदार्थ हा भेसळकारी पदार्थ नाही;

—असे दंडाधिकाऱ्यास दिसून आले तर, तो अन्नपदार्थ किंवा भेसळकारी पदार्थ जिच्या ताब्यातून घेण्यात आला असेल ती व्यक्ती] तो परत मिळण्यास हक्कदार असेल आणि राज्य शासन याबाबत निदेशित करील अशा निधीमधून अशा व्यक्तीला, तिला झालेल्या प्रत्यक्ष हानीपेक्षा अधिक नसेल इतकी, दंडाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी भरपाईची रक्कम देणे हे दंडाधिकाऱ्याच्या विवेकाधीन असेल.

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी, व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे "आणखी असे की", हे शब्द गाळले (१ एप्रिल १९७६ रोजी व तेव्हापासून).

१२. या अधिनियमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट अन्न निरीक्षकाखेरीज किंवा [1][एखाद्या मान्यताप्राप्त उपभोक्ता संघटनाखेरीज—मग खरेदीदार त्या संघटनेचा सदस्य असो किंवा नसो] अन्य कोणत्याही अन्नपदार्थाच्या खरेदीदाराला, विहित अशी फी देऊन शासकीय विश्लेषकाकडून त्या पदार्थाचे विश्लेषण करून घेण्यास, आणि शासकीय विश्लेषकाकडून त्याच्या विश्लेषणाचा अहवाल मिळवण्यास प्रतिबंध होणार नाही :

खरेदीदाराला त्या पदार्थाचे विश्लेषण करून घेता येईल.

परंतु, खरेदी करताना [2][असा खरेदीदार किंवा मान्यताप्राप्त उपभोक्ता संघटना, अशा पदार्थाचे याप्रमाणे विश्लेषण करण्याचा विचार असल्याबद्दल विक्रेत्याला कळवील :]

परंतु आणखी असे की, कलम ११ चे पोटकलम (१), पोटकलम (२) आणि पोटकलम (३) यांचे उपबंध विश्लेषणाकरिता अन्नाचा नमूना घेणाऱ्या अन्न निरीक्षकाला जसे लागू होतात तसेच ते, अशा पदार्थाचे विश्लेषण करून घेण्याचा [3][ज्याचा किंवा जिचा] विचार आहे अशा, अन्नपदार्थाच्या खरेदीदाराला, [3][किंवा अशा मान्यताप्राप्त उपभोक्ता संघटनेला,] होईल तेथवर लागू होतील :

परंतु असेही की, अन्नपदार्थ भेसळयुक्त आहे असे शासकीय विश्लेषकाच्या अभिप्रायावरून दिसून आले तर, [4][खरेदीदाराने या उपभोक्ता संघटनेने] या कलमान्वये दिलेली फी परत मिळण्याचा [4][त्याला किंवा तिला] हक्क असेल.

[5][**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या व कलम २० च्या प्रयोजनार्थ, "मान्यताप्राप्त उपभोक्ता संघटना" या संज्ञेचा अर्थ कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) या अन्वये किंवा त्याकाळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये नोंदणी झालेली "स्वेच्छा उपभोक्ता संघटना", असा आहे].

१३. [6][(१) शासकीय विश्लेषक, त्याच्याकडे विश्लेषणाकरिता सादर करण्यात आलेल्या कोणत्याही अन्नपदार्थाच्या विश्लेषणाच्या निष्कर्षाबाबतचा अभिप्राय विहित करण्यात येईल अशा स्वरूपात स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडे सुपूर्द करील.

शासकीय विश्लेषकाचा अभिप्राय.

(२) अन्नपदार्थ भेसळयुक्त आहे अशा अर्थाचा, पोटकलम (१) खालील विश्लेषणाच्या निष्कर्षाबाबतचा अभिप्राय मिळाल्यानंतर, स्थानिक (आरोग्य) प्राधिकरण, ज्या व्यक्तीकडून अन्नपदार्थाचा नमुना घेण्यात आला असेल त्या व्यक्तीच्या विरूद्ध आणि कलम १४क खाली जिचे नाव, पत्ता व इतर तपशील उघड करण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती असल्यास तिच्याविरुद्ध खटला भरून नंतर, विहित करण्यात येईल अशा रीतीने अशा व्यक्तीला किंवा, प्रकरणपरत्वे, व्यक्तींना, विश्लेषणाच्या निष्कर्षाबाबतच्या अभिप्रायाची प्रत पाठवून, त्यांच्यापैकी कोणालाही किंवा दोन्ही व्यक्तींना, त्यांची तशी इच्छा असल्यास अभिप्रायाची प्रत मिळाल्यापासून दहा दिवसांच्या मुदतीत, स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाने ठेवून घेतलेल्या अन्नपदार्थाच्या नमुन्याचे केंद्रीय अन्न प्रयोगशाळेकडून विश्लेषण करून घेण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल असे त्यांना कळवील.

(२क) पोटकलम (२) खाली न्यायालयाकडे अर्ज करण्यात येईल तेव्हा, न्यायालय, स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणास, त्याने ठेवून घेतलेल्या नमुन्याचा भाग किंवा नमुन्याचे भाग आपणांपुढे सादर करण्याची आज्ञा करील आणि अशी आज्ञा करण्यात आल्यानंतर, उक्त प्राधिकरण, त्यास अशी आज्ञा मिळाल्याच्या तारखेपासून पाच दिवसांच्या आत नमुन्याचा भाग किंवा नमुन्याचे भाग न्यायालयाकडे पाठवील.

(२ख) पोटकलम (२क) खाली स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडून नमुन्याचा भाग किंवा नमुन्याचे भाग मिळाल्यानंतर, न्यायालय प्रथम, कलम ११, पोटकलम (१) च्या खंड (ख) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे चिन्ह व मोहोर किंवा बंध जसेच्या तसेच शाबूत आहेत आणि सही किंवा, प्रकरणपरत्वे, अंगठ्याचा ठसा यात गैरफेर झालेला नाही यासंबंधी खात्री करून घेईल, आणि नमुन्याचा भाग किंवा प्रकरणपरत्वे, नमुन्याच्या भागापैकी एक भाग आपली मोहोर लावून केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाकडे पाठवील आणि त्यानंतर नमुन्याचा भाग मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत संचालक न्यायालयाकडे विहित नमुन्यामध्ये विश्लेषणाचे निष्कर्ष विनिर्दिष्ट करणारे प्रमाणपत्र पाठवील.

(२ग) जेव्हा न्यायालयाकडे नमुन्याचे दोन भाग पाठवण्यात आले असून न्यायालयाने पोटकलम (२ख) खाली केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाकडे केवळ एक भाग पाठवला असेल तेव्हा, न्यायालय शक्य तितक्या लवकर राहिलेला भाग स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडे परत पाठवील आणि न्यायालयास केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाकडून प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते प्राधिकरण तो भाग नष्ट करील :

परंतु, न्यायालयाने केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाकडे पाठवलेला नमुन्याचा भाग गहाळ किंवा खराब झाला तर, न्यायालय, स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणास, त्याने कोणताही नमुन्याचा भाग ठेवून घेतलेला असेल तर, तो न्यायालयाकडे पाठवण्यास फर्मावील आणि तो मिळाल्यानंतर न्यायालय पोटकलम (२ख) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे कार्यवाही करील.

---

१. १९८६ चा अधिनियम ७०, कलम २, खंड (क) द्वारे समाविष्ट करण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या त्याच कलमाच्या खंड (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
३. वरील अधिनियमाच्या त्याच कलमाच्या खंड (ग) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
४. वरील अधिनियमाच्या त्याच कलमाच्या खंड (घ) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
५. वरील अधिनियमाच्या त्याच कलमाच्या खंड (ङ) द्वारे समाविष्ट करण्यात आले.
६. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.

(२घ) केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाकडून विश्लेषणाच्या निष्कर्षाचे प्रमाणपत्र मिळेपर्यंत न्यायालय, खटल्याच्या संबंधात त्याच्याकडे प्रलंबित असलेली कार्यवाही पुढे चालू करणार नाही.

(२ङ) अन्न निरीक्षकाचा काही अभिप्राय असल्यास तो विचारात घेतल्यानंतर, किंवा अन्यथा, जर पोटकलम (१) खाली शासकीय विश्लेषकाने दिलेला अभिप्राय चुकीचा आहे असे स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाचे मत झाले तर, उक्त प्राधिकरण, त्याने ठेवून घेतलेल्या नमुन्याच्या भागांपैकी एक भाग विश्लेषणाकरिता अन्य कोणत्याही शासकीय विश्लेषकाकडे पाठवील आणि त्या अन्य शासकीय विश्लेषकाने नमुन्याच्या त्या भागाच्या केलेल्या विश्लेषणाच्या निष्कर्षाबाबतचा अभिप्राय, तो अन्नपदार्थ भेसळयुक्त आहे अशा अर्थाचा असेल तर, पोटकलमे (२) ते (२घ्) यांचे उपबंध, होईल तेथवर, लागू होतील.]

(३) [1][पोटकलम (२ख्)] खाली केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाने दिलेल्या प्रमाणपत्रामुळे पोटकलम (१) खाली शासकीय विश्लेषकाने दिलेला अभिप्राय निष्प्रभावी होईल.

(४) जेव्हा [1][पोटकलम (२ख्)] खाली केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाकडून मिळवलेले प्रमाणपत्र या अधिनियमाखालील किंवा भारतीय दंड संहिता, कलमे २७२ ते २७६ याखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये हजर करण्यात येईल तेव्हा, विश्लेषणाकरिता घेतलेल्या अन्नाच्या नमुन्याचा कोणताही भाग अशा कार्यवाहीच्या वेळी हजर करण्याची आवश्यकता असणार नाही. १८६० चा४५.

(५) जो कोणताही दस्तऐवज शासकीय विश्लेषकाच्या सहीचा अभिप्राय म्हणून असल्याचे अभिप्रेत असेल तो पोटकलम (३) अन्वये निष्प्रभावी झालेला नसेल तर, तो दस्तऐवज किंवा जो कोणताही दस्तऐवज केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाच्या सहीचे प्रमाणपत्र म्हणून असल्याचे अभिप्रेत असेल तो दस्तऐवज, त्यात नमूद केलेल्या तथ्यांचा पुरावा म्हणून या अधिनियमाखालील किंवा भारतीय दंड संहिता, कलमे २७२ ते २७६ यांखालील कार्यवाहीत वापरता येईल : १८६० चा४५.

[1][परंतु, कलम १६, पोटकलम (१क्) च्या परंतुकात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अन्नपदार्थाच्या नमुन्याच्या भागाच्या विश्लेषणाच्या संबंधातील प्रमाणपत्र नसलेला जो कोणताही दस्तऐवज केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाच्या सहीचे प्रमाणपत्र म्हणून असल्याचे अभिप्रेत असेल तो, त्यात नमूद केलेल्या तथ्यांचा अंतिम व निर्णायक पुरावा असेल.]

[2][**स्पष्टीकरण.**—या कलमात आणि कलम १६, पोटकलम (१) च्या खंड (च्) मध्ये "केंद्रीय अन्न प्रयोगशाळेचा संचालक" या संज्ञेमध्ये या कलमाच्या प्रयोजनार्थ केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही अन्न प्रयोगशाळेचा त्या त्या वेळी प्रभारी असलेला अधिकारी (मग तो कोणत्याही पदनामाने ओळखला जात असो) समाविष्ट असेल.]

संकीर्ण

**निर्माणक, वितरक आणि व्यापारी यांनी प्राश्वासन द्यावयाचे.** [3][ १४. कोणत्याही अन्नपदार्थाचा [4][कोणताही निर्माणक किंवा वितरक किंवा व्यापारी] याने कोणत्याही विक्रेत्याला गुणधर्म आणि प्रत यांच्याविषयी त्या विक्रेत्याला विहित नमुन्यात प्राश्वासन दिल्याशिवाय त्याला असा कोणताही अन्नपदार्थ विकता येणार नाही :

[5][परंतु, कोणत्याही अन्नपदार्थाच्या विक्रीच्या संबंधात त्या अन्नपदार्थाचा निर्माणक किंवा वितरक किंवा व्यापारी याने विक्रेत्याला दिलेले देयक, रोखीचे टिपण किंवा बीजक हे असा निर्माणक, वितरक किंवा व्यापारी याने या कलमाखाली दिलेले प्राश्वासन असल्याचे मानण्यात येईल.]

**स्पष्टीकरण.**—हे कलम, कलम १९ चे पोटकलम (२) आणि कलम २०क यांमधील "वितरक" या संज्ञेमध्ये कमिशन एजन्टचा समावेश असेल.

**विक्रेत्याने अन्नपदार्थ ज्या व्यक्तीकडून खरेदी केला तिचे नाव, इत्यादी उघड करणे.** १४क. अन्नपदार्थाच्या प्रत्येक विक्रेत्याला, त्यास तसे सांगितले असता, त्याने तो अन्नपदार्थ कोणाकडून खरेदी केला त्या व्यक्तीचे नाव, पत्ता व इतर तपशील अन्न निरीक्षकाकडे उघड करावा लागेल.]

**अन्नविषबाधेबाबत अधिसूचना.** १५. [6][केंद्र शासन किंवा राज्य शासन,] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात आपला व्यवसाय करणाऱ्या वैद्यक व्यवसायींना, अन्नविषबाधेच्या ज्या ज्या घटना त्यांच्या निदर्शनास येतील अशा सर्व घटना त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांस कळवण्यास फर्मावू शकेल.

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १० द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ७ द्वारे मूळ कलम १४ ऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. १९७६ चा अधिनियम ३४, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

६. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ८ द्वारे मूळ कलम १४ ऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

१६. [1][(१) पोटकलम (१क्) च्या उपबंधांच्या अधीनतेने, जर कोणत्याही व्यक्तीने,— शिक्षा.

(क्) स्वतः किंवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी,—

(एक) जो अन्नपदार्थ कलम २, खंड (एक-क्) च्या उपखंड (ड्) च्या अर्थानुसार भेसळयुक्त असेल अथवा त्या कलमाच्या खंड (नऊ) च्या अर्थानुसार गैरछापाचा असेल अथवा या अधिनियमाच्या अगर त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधाखाली किंवा अन्न (आरोग्य) प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे ज्याच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली असेल असा ;

(दोन) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या कोणत्याही उपबंधांचे उल्लंघन करून, उपखंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अन्नपदार्थाहून अन्य असा ;

—कोणताही अन्नपदार्थ, भारतात आयात केला किंवा विक्रीसाठी त्याची निर्मिती केली किंवा तो साठवला, विकला किंवा वितरित केला तर; किंवा

(ख्) स्वतः किंवा तिच्यावतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी, आरोग्यास अपायकारक नसलेला असा कोणताही भेसळकारी पदार्थ भारतात आयात केला किंवा विक्रीसाठी त्याची निर्मिती केली किंवा तो साठवला, विकला किंवा वितरित केला तर; किंवा

(ग्) या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केल्याप्रमाणे नमुना घेण्यास अन्न निरीक्षकाला प्रतिबंध केला तर; किंवा

(घ्) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली कोणत्याही अन्न निरीक्षकाला प्रदान करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही शक्तीचा वापर करण्यास त्याला प्रतिबंध केला तर; किंवा

(ङ्) ती स्वतः अन्नपदार्थाचा निर्माणक असून तिने आरोग्यास अपायकारक नसलेला असा कोणताही भेसळकारी पदार्थ स्वतःजवळ किंवा तिच्या ताब्यातील कोणत्याही वास्तूमध्ये बाळगला तर; किंवा

(च्) केंद्रीय अन्न प्रयोगशाळेच्या संचालकाने किंवा शासकीय विश्लेषकाने केलेली चाचणी किंवा विश्लेषण याबाबतच्या कोणत्याही अभिप्रायाचा किंवा प्रमाणपत्राचा किंवा त्यामधील कोणत्याही उताऱ्याचा कोणत्याही अन्नपदार्थाची जाहिरात करण्यासाठी वापर केला तर; किंवा

(छ्) आपण विकलेल्या कोणत्याही अन्नपदार्थाच्या संबंधात विक्रेत्याला स्वतः किंवा आपल्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी लेखी खोटे प्राश्वासन दिले तर;

—ती व्यक्ती कलम ६ च्या उपबंधांखाली ज्या शिक्षेस पात्र असेल त्या शिक्षेव्यतिरिक्त, आणखी ती सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही, परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल :]

परंतु,—

(एक) जर अपराध खंड (क्) च्या उपखंड (एक) खाली घडलेला असेल आणि माणसाकडून भेसळ झालेल्या मूलाच्च स्वरूपातील अन्नपदार्थाच्या किंवा कलम २, खंड (नऊ), उपखंड (ट्) च्या अर्थानुसार गैरछापाच्या अन्नपदार्थाच्या संबंधात असेल: किंवा

(दोन) जर अपराध खंड (क्) च्या उपखंड (दोन) खाली घडलेला असेल, परंतु कलम २३, पोटकलम (१क्), खंड (क्) किंवा खंड (छ्) खाली किंवा कलम २४, पोटकलम (२), खंड (ख्) खाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या उल्लंघनाच्या संबंधात नसेल तर,

—कोणत्याही पुरेशा व विशेष कारणास्तव न्यायालय, न्यायनिर्णयात ती कारणे नमूद करून, तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, जर अपराध खंड (क्) च्या उपखंड (दोन) खाली घडलेला असेल आणि कलम २३, पोटकलम (१क्) च्या खंड (क्) किंवा खंड (छ्) खाली किंवा कलम २४, पोटकलम (२), खंड (ख्) खाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या उल्लंघनाच्या संबंधात असेल तर, कोणत्याही पुरेशा व विशेष कारणास्तव न्यायालय, न्यायनिर्णयात ती कारणे नमूद करून, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा देऊ शकेल.]

---

१. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी नवीन मजकूर घातला होता, त्याऐवजी आता १९७६ चा अधिनियम ३४, कलम १२ द्वारे हा नवीन मजकूर घातला (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

[1][ (१क्) जर कोणत्याही व्यक्तीने, स्वत: किंवा तिच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी,—

(एक) कलम २, खंड एक—(एक-क्) याचे उपखंड (५) ते (ठ) पर्यंतच्या उपखंडांपैकी (दोन्ही उपखंड धरून) कोणत्याही उपखंडाच्या अर्थानुसार भेसळयुक्त असलेला असा कोणताही अन्नपदार्थ; किंवा

(दोन) आरोग्यास अपायकारक असेल असा कोणताही भेसळकारी पदार्थ;

—भारतात आयात केला किंवा त्याची विक्रीकरिता निर्मिती केली किंवा तो साठवला, विकला किंवा वितरित केला तर, ती व्यक्ती कलम ६ च्या उपबंधाखाली ज्या शिक्षेस पात्र असेल त्या शिक्षेव्यतिरिक्त आणखी ती, एक वर्षापेक्षा कमी असणार नाही, परंतु सहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास आणि दोन हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल:

परंतु, जर असा अन्नपदार्थ किंवा भेसळकारी पदार्थ कोणत्याही व्यक्तीने सेवन केल्यास तिचा मृत्यू होणे संभवनीय असेल किंवा भारतीय दंड संहिता, कलम ३२० च्या अर्थानुसार जबर दुखापत ठरेल अशा प्रकारची इजा तिच्या शरीरास होणे संभवनीय असेल तर, तीन वर्षांपेक्षा कमी असणार नाही परंतु हयातीपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल]. १८६० चा ४५.

[2][ (१कक्)] कोणताही अन्नपदार्थ कलम १०, पोटकलम (४) अन्वये जिच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवण्यात आला असेल, अशा कोणत्याही व्यक्तीने अशा पदार्थात गैरफेर केला किंवा अन्य कोणत्याही प्रकारे त्यात ढवळाढवळ केली तर, सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही, परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, आणि एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल.

[3][ (१ख्) कोणताही अन्नपदार्थ कलम १०, पोटकलम (४) खाली जिच्या ताब्यात सुरक्षितपणे ठेवण्यात आला असेल, अशा कोणत्याही व्यक्तीने असा पदार्थ विकला किंवा वितरित केला आणि ज्याच्या समोर असा पदार्थ हजर करण्यात आला असेल त्या दंडाधिकाऱ्यास, कलम २, खंड (एक-क्), उपखंड (ज्) याच्या अर्थानुसार तो भेसळयुक्त असल्याचे आढळले असेल, आणि कोणत्याही व्यक्तीने त्याचे सेवन केले असता तिचा मृत्यू होणे संभवनीय असेल किंवा भारतीय दंड संहिता, कलम ३२० च्या अर्थानुसार जबर दुखापत ठरेल अशी इजा तिच्या शरीरास होणे संभवनीय असेल तर, पोटकलम (१कक्) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, तीन वर्षांपेक्षा कमी असणार नाही परंतु हयातीपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल.] १८६० चा ४५.

(१ग्) जर कोणत्याही व्यक्तीने कलम १४ किंवा कलम १४क च्या उपबंधाचे उल्लंघन केले तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास, आणि पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही इतक्या द्रव्यदंडास ती पात्र होईल.

(१घ्) या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्यानंतर तशाच प्रकारचा अपराध केला तर, पोटकलम (२) च्या उपबंधांना बाधा न येता, ज्या न्यायालयासमोर दुसरी किंवा नंतरची दोषसिद्धी होईल ते न्यायालय, त्या व्यक्तीस या अधिनियमाखाली कोणतेही लायसन दिलेले असल्यास ते रद्द करण्याचा आदेश देऊ शकेल आणि तद्नंतर असे लायसन, या अधिनियमात किंवा त्याखाली केलेल्या नियमांत अंतर्भुत असले तरी, रद्द होईल.

(२) या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्यानंतर तशाच प्रकारचा अपराध केला तर, ज्या न्यायालयासमोर दुसरी किंवा नंतरची दोषसिद्धी होईल त्या न्यायालयाने अपराध्याचे नाव व राहण्याचे ठिकाण, अपराध आणि दिलेली शिक्षा यासंबंधीचे वृत्त, न्यायालय निवेदन करील अशा वृत्तपत्रामध्ये किंवा अशा अन्य प्रकारे अपराध्यांच्या खर्चाने प्रसिद्ध करवणे हे कायदेशीर असेल अशा प्रसिद्धीचा खर्च हा दोषसिद्धीच्या संबंधातील खर्चाचा एक भाग असल्याचे मानण्यात येईल आणि द्रव्यदंडाप्रमाणे त्याच रीतीने तो वसूल करण्याजोगा असेल.

खटल्यांची संक्षिप्त संपरीक्षा करण्याची न्यायालयाची शक्ती.

[4][१६क. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, यामध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, कलम १६ च्या पोटकलम (१) खालील सर्व अपराधांची संपरिक्षा, राज्य शासनाने याबाबतीत, विशेष रीत्या शक्तीतप्रदान केलेल्या पहिल्या वर्गाच्या न्यायिक दंडाधिकाऱ्याकडून किंवा महानगर दंडाधिकाऱ्याकडून संक्षिप्तरीत्या करण्यात येईल आणि अशा संपरीक्षेस उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यातील उपबंध शक्यतोवर लागू होतील. १९७४ चा २.

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १२ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे नवीन क्रमांक दिला (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

परंतु, या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षेमधील कोणत्याही दोषसिद्धीच्या बाबतीत, दंडाधिकाऱ्याने जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासाचा शिक्षादेश देणे हे कायदेशीर असेल :

परंतु आणखी असे की, या कलमाखालील संक्षिप्त संपरीक्षेच्या प्रारंभी किंवा ती चालू असताना, जर दंडाधिकाऱ्यास असे वाटले की, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाचा शिक्षादेश द्यावा लागेल किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव खटल्याची संक्षिप्त रीतीने संपरीक्षा करणे अनिष्ट होईल असे त्या प्रकरणाचे स्वरूप आहे तर, दंडाधिकारी पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर तसे आदेशाद्वारे नमूद करील आणि ज्याची तपासणी करण्यात आली असेल त्या कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलावील आणि उक्त संहितेद्वारे उपबंधित केलेल्या रीतीने खटल्याची सुनावणी किंवा फेरसुनावणी करण्याचे काम पुढे सुरू करील.]

[1][१७. (१) या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केला असेल तर,— कंपन्यांनी केलेले अपराध.

(क) (एक) कंपनीचे कामकाज चालविण्याबद्दल कंपनीची प्रभारी म्हणून किंवा कंपनीस जबाबदार म्हणून पोटकलम (२) खाली नामनियुक्त केलेली अशी कोणतीही व्यक्ती असल्यास अशी व्यक्ती (तिचा या कलमात यापुढे 'जबाबदार व्यक्ती' म्हणून निर्देश करण्यात आला आहे); किंवा

(दोन) अशा प्रकारे कोणतीही व्यक्ती नामनियुक्त करण्यात आली नसेल तर, अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालविण्याबद्दल कंपनीची प्रभारी आणि कंपनीला जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती; आणि

(ख) कंपनी,

—अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यास आणि त्यानुसार शिक्षा मिळण्यास त्या पात्र असतील :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने अपराध आपल्या नकळत घडला आणि असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्व प्रकारे यथायोग्य तत्परता दाखविली होती असे शाबीत केले तर, या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ती या अधिनियमात उपबंधित केलेल्या कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) कोणतीही कंपनी, कंपनीकडून या अधिनियमाखालील कोणताही अपराध घडू नये म्हणून आवश्यक किंवा समयोचित असतील अशा सर्व शक्तींचा वापर करण्यासाठी व अशा सर्व उपाययोजना करण्यासाठी तिच्या संचालकांपैकी किंवा व्यवस्थापकांपैकी कोणालाही (अशा व्यवस्थापकाची मुख्यत्वेकरून व्यवस्थापकीय किंवा पर्यवेक्षकीय नात्याने नियुक्ती केली असताना) लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत करू शकेल आणि असा संचालक किंवा व्यवस्थापक याला जबाबदार व्यक्ती म्हणून आपण नामनियुक्त केले आहे अशा अर्थाची नोटीस विहित करण्यात येईल अशा नमुन्यात विहित अशा रीतीने, आणि सोबत याप्रमाणे नामनियुक्त होण्यास अशा संचालकाने किंवा व्यवस्थापकाने दिलेली लेखी संमती स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडे पाठवू शकेल.

**स्पष्टीकरण.**—कंपनीच्या निरनिराळ्या आस्थापना किंवा शाखा असल्यास अथवा कोणत्याही आस्थापनेत किंवा शाखेत निरनिराळी युनिटे असल्यास, निरनिराळ्या आस्थापनांच्या किंवा शाखांच्या अथवा युनिटांच्या संबंधात या पोटकलमाखाली निरनिराळ्या व्यक्ती नामनियुक्त करता येतील व कोणत्याही आस्थापनेच्या, शाखेच्या किंवा युनिटाच्या संबंधात नामनियुक्त केलेली व्यक्ती ही, अशी आस्थापना, शाखा किंवा युनिट यांच्या संबंधातील जबाबदार व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (२) खाली नामनियुक्त केलेली व्यक्ती,—

(एक) कंपनीकडून अशी नामनियुक्ती रद्द करणारी त्यानंतरची नोटीस स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणास मिळणे; किंवा

(दोन) त्या कंपनीचा संचालक किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक असण्याचे बंद होणे ; किंवा

(तीन) नामनियुक्ती रद्द करण्यासाठी कंपनीला तसे कळवून स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाला तिने विनंती करणे [स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणाकडून ती विनंती मान्य करण्यात येईल];

—यांपैकी जी गोष्ट सर्वांत आधी घडेल ती घडेतोपर्यंत जबाबदार व्यक्ती असण्याचे चालू राहील :

परंतु, जेव्हा अशी व्यक्ती कंपनीचा संचालक किंवा, प्रकरणपरत्वे, व्यवस्थापक असण्याचे बंद होईल तेव्हा, ती व्यक्ती ते वृत्त स्थानिक (आरोग्य) प्राधिकरणास कळवील :

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १४ द्वारे मूळ कलम १७ ऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

परंतु आणखी असे की, जेव्हा अशी व्यक्ती खंड (तीन) खाली विनंती करील तेव्हा स्थानिक (आरोग्य) प्राधिकरण अशी नामनियुक्ती, ज्या तारखेस विनंती करण्यात आली असेल त्या आधीच्या तारखेपासून रद्द करणार नाही.

(४) पूर्ववर्ती पोटकलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील अपराध कंपनीने केला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी [पोटकलम (२) खाली नामनियुक्त केलेली व्यक्ती नव्हे] यांच्या संमतीने, किंवा मूकानुमतीने करण्यात आला आहे किंवा त्याने केलेल्या कोणत्याही हलगर्जीपणाशी त्या अपराधाचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत करण्यात आले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हा सुद्धा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा मिळण्यास तो पात्र असेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय, असा आहे व त्यात पेढीचा किंवा अन्य व्यक्तिसंघाचा अंतर्भाव आहे;

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार, असा आहे; आणि

(ग) हॉटेल उद्योगातील कंपनीच्या संबंधात "व्यवस्थापक" या संज्ञेमध्ये, त्या कंपनीने व्यवस्थापन केलेल्या किंवा चालवलेल्या कोणत्याही हॉटेलच्या खाद्यपेयव्यवस्था विभागाच्या प्रभारी व्यक्तीचा समावेश होतो.]

संपत्ती समपहृत करणे. १८. जर एखादी व्यक्ती या अधिनियमातील कोणत्याही उपबंधांचे किंवा त्याखालील कोणत्याही नियमाचे उल्लंघन केल्याबद्दल या अधिनियमाखाली दोषी ठरली असेल तर, ज्याच्या संबंधात उल्लंघन झाले असेल तो अन्नपदार्थ समपहृत करून सरकारजमा करता येईल :

[1][परंतु, त्या अन्नपदार्थाचे पुन:संस्करण केल्यास तो माणसांनी उपयोग करण्यायोग्य अशा विहित दर्जानुरूप करता येण्यासारखा आहे अशी न्यायालयाची खात्री पटली तर, न्यायालय, आदेश काढून, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली पुन:संस्करण करून नंतर, या अधिनियमातील अन्य उपबंधांच्या अधीनतेने, तो अन्नपदार्थ विकता यावा यासाठी, मालकाने जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र निष्पादित करून दिले की त्यास तो परत करण्यात यावा असे फर्मावू शकेल.]

या अधिनियमाखालील खटल्यांमध्ये कोणते बचाव देता येतील किंवा देता येणार नाहीत. १९. (१) कोणत्याही भेसळयुक्त किंवा गैरछापाच्या अन्नपदार्थांची विक्री करण्याच्या संबंधातील अपराधाबद्दलच्या खटल्यांमध्ये, आपण विक्री केलेल्या अन्नपदार्थाचा गुणधर्म, त्यातील मुख्य द्रव्य किंवा त्याची प्रत याबाबत विक्रेत्याला माहिती नव्हती किंवा एखादा पदार्थ खरेदीदाराने विश्लेषणाकरिता खरेदी केलेला असून त्या विक्रीमुळे त्याचा तोटा झाला नाही असे अभिकथन करणे हा बचाव होणार नाही.

[2][(२) (क) एखादा भेसळयुक्त किंवा गैरछापाचा अन्नपदार्थ;

(एक) त्याच्या विक्रीकरिता लायसन विहित करण्यात आले असेल त्याबाबतीत, यथोचितरीत्या लायसन धारण करणारा निर्माणक, वितरक किंवा व्यापारी यांच्याकडून,

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, विहित नमुन्यातील लेखी प्राश्वासनासह कोणताही निर्माणक, वितरक किंवा व्यापारी यांच्याकडून,

—आपण खरेदी केला होता; आणि

(ख) तो अन्नपदार्थ आपल्या ताब्यात असताना आपण योग्यप्रकारे साठवून ठेवला होता आणि आपण तो जसा खरेदी केला होता तशाच स्थितीत विकला;

—असे विक्रेत्याने शाबीत केले तर, त्याने तशा भेसळयुक्त किंवा गैरछापाच्या अन्नपदार्थाच्या विक्रीच्या संबंधातील अपराध केला आहे असे मानण्यात येणार नाही.]

(३) [1][कलम १४ मध्ये] निर्दिष्ट केलेल्या प्राश्वासन ज्या व्यक्तीने दिले असे अभिकथन करण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती सुनावणीच्या वेळी उपस्थित राहण्यास व साक्ष देण्यास हक्कदार असेल.

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १५ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).
२. १९६४ चा अधिनियम ४९, कलम १० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२०. (१) [1][कलम १४ किंवा कलम १४क खालील अपराध वगळून या अधिनियमाखालील अपराधांबद्दलचा खटला] [2][केंद्र शासन किंवा राज्य शासन [3]* * * अथवा केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने [3]* * * याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेली व्यक्ती] यांच्याखेरीज किंवा त्यांच्या लेखी संमतीखेरीज कोणालाही सुरू करता येणार नाही: अपराधांची दखल घेणे व संपरीक्षा.

परंतु, या अधिनियमाखालील अपराधाबद्दलचा खटला, कलम १२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या खरेदीदाराने [4][किंवा मान्यताप्राप्त संघटनेने] न्यायालयामध्ये तक्रारीसोबत शासकीय विश्लेषकाचा अभिप्राय हजर केल्यास [5][त्याला किंवा तिला] सुरू करता येईल.

[1][ (२) महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकारी यांच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

१९७४ चा २. (३) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १६, पोटकलम (१कक) खालील शिक्षापात्र अपराध हा दखलपात्र व बिनजामिनी गुन्हा असेल.]

[6][२०क. कोणत्याही अन्नपदार्थाचा निर्माणक, वितरक किंवा व्यापारी नसलेल्या कोणत्याही व्यक्तीने जो अपराध केल्याचे अभिकथित करण्यात येईल अशा, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा चालू असताना कोणत्याही वेळी न्यायालयाची, त्याच्यासमोर सादर केलेल्या पुराव्यावरून जर अशी खात्री पटली की, असा निर्माणक, वितरक किंवा व्यापारी हा सुद्धा त्या अपराधामध्ये गुंतलेला आहे तर, [7][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम ३१९, पोटकलम (३) यामध्ये] किंवा कलम २० यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जणू त्याच्याविरुद्ध कलम २० खाली खटला दाखल करण्यात आला आहे असे समजून त्याप्रमाणे न्यायालयास त्याच्याविरुद्ध कार्यवाही करता येईल.] निर्माणक, इत्यादींवर खटला चालवण्याची न्यायालयाची शक्ती.

१९७४ चा २.

१९५८ चा २०. १९७४ चा २. [8][२०कक. अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८, यामध्ये किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, याचे कलम ३६० यामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरलेल्या व्यक्तीला, ती व्यक्ती अठरा वर्षांखालील वयाची असल्याखेरीज लागू होणार नाही.] अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ व फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यांचे कलम ३६० लागू करणे.

१९७४ चा २. [9][२१. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, याच्या कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी उक्त कलमाखालील आपल्या शक्तींचा अतिक्रम करून कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याने किंवा कोणत्याही प्रथम वर्ग न्यायिक दंडाधिकाऱ्याने, आजीव कारावासाचा किंवा सहा वर्षांपेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाचा शिक्षादेश खेरीजकरून, या अधिनियमाद्वारे प्राधिकृत करण्यात आलेला कोणताही शिक्षादेश देणे हे फायदेशीर असेल.] वाढीव शिक्षा ठोठावण्याची दंडाधिकाऱ्याची शक्ती.

२२. या अधिनियमाखालील सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर वैध कार्यवाही सुरू करता येणार नाही. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईला संरक्षण.

[10][२२क. या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही उपबंधांची अंमलबजावणी करण्यासंबंधी स्वत:ला आवश्यक वाटतील असे निदेश केंद्र शासन राज्य शासनाला देऊ शकेल व राज्य शासन अशा निदेशांचे अनुपालन करील.] केंद्र शासनाची निदेश देण्याची शक्ती.

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १६ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम ४९, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १६ द्वारे गाळले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. १९८६ चा अधिनियम ७०, कलम ३, खंड (क) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

५. १९८६ चा अधिनियम ७०, कलम ३, खंड (ख) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

६. १९६४ चा अधिनियम ४९, कलम १२ द्वारे घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

७. १९७६ चा अधिनियम ३४, कलम १७ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून.)

८. वरील अधिनियमाच्या कलम १८ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

१०. वरील अधिनियमाच्या कलम २० द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

केंद्र शासनाची नियम करण्याची शक्ती.

२३. [1][(१) केंद्र शासनाला या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याकरिता, समितीशी विचारविनिमय करून आणि शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पूर्वप्रकाशन करून नियम करता येतील:

परंतु, असा विचारविनिमय न करता नियम करणे आवश्यक आहे अशी परीस्थिती निर्माण झाली आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, समितीच्या विचारविनिमयाशिवाय तसे करता येईल. परंतु अशा बाबतीत, नियम केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत समितीशी विचारविनिमय करण्यात येईल आणि उक्त नियमांच्या विशोधनाच्या संबंधात समितीकडून करण्यात येतील अशा सूचना केंद्र शासन विचारात घेईल.]

[1][(१क)] [2][विशेषत: व पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येईल :—

(क) ज्यांची आयात करण्यासाठी लायसन आवश्यक आहे असे अन्नपदार्थ किंवा अन्नपदार्थांचे वर्ग विनिर्दिष्ट करणे आणि अशा लायसनाचा नमुना व शर्ती, ते देण्याची शक्ती प्रदान केलेले प्राधिकरण, [3][त्याकरिता द्यावयाची फी, लायसनाच्या शर्तींचे पालन करण्याबद्दल प्रतिभूती म्हणून कोणत्याही रकमेची ठेव आणि ज्या परिस्थितीत असे लायसन किंवा प्रतिभूती रद्द किंवा समपहृत करता येईल ती परिस्थिती विहित करणे];

(ख) कोणत्याही अन्नपदार्थांची प्रतविषयक मानके निश्चित करणे व त्यासंबंधात अनुज्ञेय कमीजास्तपणाच्या मर्यादा निश्चित ठरवणे;

(ग) केंद्र शासन याबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील असा कोणताही अन्नपदार्थ किंवा अशा वर्गाचे अन्नपदार्थ यांचे उत्पादन, वितरण व विक्री यांवर कडक नियंत्रण घालण्यासाठी विशेष उपबंध करणे,—यामध्ये, जेथे त्यांची निर्मिती करण्यात येत असेल त्या वास्तूची नोंदणी करणे, ती वास्तू स्वच्छ ठेवणे, असा पदार्थ किंवा अशा वर्गाचे पदार्थ यांचे उत्पादन, वितरण व विक्री यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींचे आरोग्यरक्षण करणे या बाबी समाविष्ट आहेत;

(घ) पदार्थांचे स्वरूप, प्रत किंवा परिमाण याबाबत लोकांची किंवा खरेदीदाराची फसवणूक किंवा दिशाभूल होऊनये [4][किंवा भेसळीस प्रतिबंध व्हावा] या दृष्टीने कोणत्याही अन्नपदार्थाचे आवेष्टन व लेबल आणि अशा आवेष्टनाची किंवा लेबलाची आकृती यांवर निर्बंध घालणे;

(ङ) अन्न निरीक्षक व शासकीय विश्लेषक यांच्या अर्हता, शक्ती व कर्तव्ये निश्चित करणे;

[4][(ङङ) शासकीय विश्लेषकाकडून या अधिनियमाखाली ज्या प्रयोगशाळेत अन्नपदार्थाच्या किंवा भेसळकारी पदार्थाच्या नमुन्याचे विश्लेषण करता येईल अशा प्रयोगशाळा निश्चित करणे;]

(च) अन्न म्हणून वापर करण्यात आल्यास आरोग्याला अपायकारक होईल अशा कोणत्याही पदार्थाच्या विक्रीस बंदी घालणे किंवा त्याच्या विक्रीच्या शर्ती निश्चित करणे किंवा कोणत्याही अन्नपदार्थाच्या निर्मितीतील घटकद्रव्य म्हणून त्याचा वापर होण्यावर कोणत्याही प्रकारचा निर्बंध घालणे किंवा लायसने देऊन कोणत्याही अन्नपदार्थाच्या निर्मितीचे किंवा विक्रीचे नियमन करणे;

(छ) सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने कोणत्याही अन्नपदार्थाच्या विक्रीच्या शर्ती किंवा विक्रीचे लायसन देण्याबाबतच्या शर्ती निश्चित करणे;

(ज) विश्लेषणाकरिता खरेदी केलेल्या अन्नाचा नमुना ज्यामध्ये ठेवण्यात आला असेल ती पात्रे कशा रीतीने मोहोरबंद करावीत किंवा बांधावीत ते विनिर्दिष्ट करणे;

[4][(जज) विश्लेषणाच्या पद्धती निश्चित करणे;]

(झ) मीठ व साखर यांखेरीज अनुज्ञेय अशा रक्षकद्रव्यांची यादी—फळे, भाज्या किंवा त्यांपासून बनवलेले पदार्थ किंवा अन्य कोणताही अन्न पदार्थ टिकविण्याकरिता हीच तेवढी द्रव्ये वापरता येतील—व प्रत्येक रक्षकद्रव्याचे कमाल परिमाण विनिर्दिष्ट करणे;

(ञ) कोणत्याही अन्नपदार्थात वापरता येतील अशी रंजकद्रव्ये व त्यांचे कमाल परिमाण विनिर्दिष्ट करणे;

---

१. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २१ द्वारे नवीन पोटकलम (१) घातले व मूळ पोटकलम (१) ला (१क) असा नवीन क्रमांक दिला (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २१ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. १९६४ चा अधिनियम ४९, कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मार्च, १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २१ द्वारे घातले (१ एप्रिल, १९७६ रोजी व तेव्हापासून).

(ट) या अधिनियमापासून किंवा त्यामध्ये आवश्यक करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींपासून कोणत्याही अन्नपदार्थास किंवा कोणत्याही वर्गाच्या अन्नपदार्थास, काही शर्ती विनिर्दिष्ट केल्या असल्यास त्यांच्या अधीनतेने, सूट देणे ;

(ठ) अन्नातील भेसळकारी पदार्थ म्हणून वापरण्यात येणारा पदार्थ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पदार्थांची निर्मिती, वाहतूक किंवा विक्री यावर बंदी घालणे किंवा त्याबाबत नियमन करणे ;

(ड) (एक) कोणत्याही अन्नपदार्थात कोणत्याही प्रकारे पाणी किंवा अन्य विरलकारक किंवा भेसळकारी पदार्थ यांची भर घालण्यास ;

(दोन) कोणत्याही अन्नपदार्थामधून कोणतेही घटकद्रव्य काढून घेण्यास ;

(तीन) ज्यामध्ये अशी भर घातली असेल किंवा ज्यामधून घटकद्रव्य काढून घेतले असेल किंवा ज्यावर कृत्रिमपणे संस्कार करण्यात आला असेल अशा कोणत्याही अन्नपदार्थाची विक्री करण्यास ;

(चार) स्वभावतः किंवा स्वरूपतः जे सारखे आहेत अशा दोन किंवा अधिक अन्नपदार्थांचे मिश्रण करण्यास ;

---बंदी करणे किंवा त्याबाबत नियमन करणे ;

(ढ) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधांनुसार नसतील असे अन्नपदार्थ नष्ट करण्याबाबत उपबंध करणे.

[1][(२) या अधिनियमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते सत्रासीन असताना, [2][एका सत्राने किंवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून तो बनलेला असेल अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवण्यात येईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या लगतनंतरचे सत्र संपण्यापूर्वी जर,] त्या नियमात कोणतेही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम केला जाऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम त्यानंतर अशा बदललेल्या स्वरूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि अशा कोणत्याही बदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

२४. (१) राज्य शासनाला, या अधिनियमाच्या उपबंधाची अंमलबजावणी करण्यासाठी नियम करावयाचे झाल्यास, समितीचा विचार घेऊन व पूर्वप्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने, कलम २३ च्या कक्षेत न येणाऱ्या बाबींसंबंधात नियम करता येतील. राज्य शासनाची नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे,---

(क) अन्न (आरोग्य) प्राधिकरण [3][व स्थानिक प्राधिकरण यांच्या व स्थानिक (आरोग्य) प्राधिकरण यांच्या या अधिनियमाखालील] शक्ती व कर्तव्ये निश्चित करता येतील ;

[4](ख) अन्नपदार्थांची किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट अन्नपदार्थाची किंवा विनिर्दिष्ट वर्गाच्या अन्नपदार्थांची विक्रीकरिता निर्मिती करण्यासाठी, साठवण करण्यासाठी, विक्री करण्यासाठी आणि वितरण करण्यासाठी द्यावयाच्या लायसनांचे नमुने, अशा लायसनांकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना, कोणत्या शर्तीच्या अधीनतेने अशी लायसने दिली जातील, ती देण्याचे अधिकार असलेले प्राधिकरण [5][त्यासाठी द्यावयाची फी, लायसनाच्या शर्तींचे पालन करण्याकरिता प्रतिभूती म्हणून किती रक्कम ठेवावयाची आणि कोणत्या परिस्थितीत असे लायसन किंवा प्रतिभूती [6][निलंबित रद्द किंवा समपहृत करता येईल ते] विहित करता येईल;]

(ग) कोणत्याही अन्नपदार्थांचे विश्लेषण करण्याकरिता किंवा या अधिनियमाखाली ज्याकरिता फी विहित करता येत असेल अशा कोणत्याही बाबीकरिता किती फी द्यावयाची ते निर्देशित करता येईल ;

---

१. १९६४ चा अधिनियम ४९, कलम १३ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ मार्च १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २१ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल १९७६ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम २२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल १९७६ रोजी व तेव्हापासून).

४. १९६४ चा अधिनियम ४९, कलम १४ द्वारे गाळले.

५. वरील अधिनियमाच्या कलम १४ द्वारे "आणि त्यासाठी द्यावयाची फी" या शब्दाऐवजी घातले (१ मार्च १९६५ रोजी व तेव्हापासून).

६. १९७६ चा अधिनियम ३४, कलम २२ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१ एप्रिल १९६५ रोजी व तेव्हापासून).

(घ) या अधिनियमाखाली बसवलेला द्रव्यदंड वसूल झाल्यावर तो संपूर्णपणे किंवा त्याचा काही भाग एखाद्या स्थानिक प्राधिकरणाला देण्यात यावा असे निदेशित करता येईल;

(ङ) या अधिनियमाद्वारे राज्य शासनाला किंवा अन्न (आरोग्य) प्राधिकरणाला दिलेल्या शक्ती व नेमून दिलेली कार्ये दुय्यम प्राधिकरणांकडे किंवा स्थानिक प्राधिकरणांकडे प्रत्यायोजित करण्याबाबत उपबंध करता येईल.

(३) राज्य शासनांनी या अधिनियमाखाली केलेले सर्व नियम, ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर संबंधित राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येतील.

निरसन व व्यावृत्ती.

२५. (१) ज्याच्यावर या अधिनियमाचा विस्तार आहे अशा कोणत्याही राज्यात जर या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी या अधिनियमाला समनुरुप असा कोणताही कायदा अंमलात असेल तर, असा प्रारंभ होताच तो समनुरुप कायदा निरसित ठरेल.

(२) या अधिनियमामुळे कोणताही समनुरुप कायदा निरसित झाला तरी, अशा समनुरुप कायद्याखाली केलेले व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अंमलात असलेले अन्नभेसळ प्रतिबंधासंबंधीचे सर्व नियम, विनियम व उपविधी हे, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत किंवा त्यास प्रतिकूल असतील तेवढी बाब व तेवढी मर्यादा खेरीजकरून एरव्ही आणि या [1]अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे ते बदलले जाईपर्यंत, विशोधित केले जाईपर्यंत किंवा निरसित केले जाईपर्यंत तसेच अंमलात राहतील.

---

१. हा अधिनियम जम्मू आणि काश्मीर राज्याला लागू करताना, कलम २५ मध्ये, पोट-कलम (२) नंतर पुढील पोट-कलम घालण्यात येईल, *ते असे :—

"(३) (क) या कलमातील, या अधिनियमाच्या प्रारंभासंबंधीच्या निर्देशांचा अर्थ, अन्न भेसळ प्रतिबंधक (विशोधन) अधिनियम, १९७१, याच्या प्रारंभासंबंधीचे *निर्देश म्हणून लावला जाईल

(ख) शंकानिरसनार्थ याद्वारे असे जाहिर केले आहे की, पोट-कलम (२) चे उपबंध सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७, (१८९७ चा १०) याच्या कलम ६ मधील उपबंधांना बाध आणणार नाहीत आणि जम्मू व काश्मीर राज्यामध्ये अंमलात असलेला समनुरुप कायदा म्हणजे एखादी अधिनियमिती असावी त्याप्रमाणे ते अशा समनुरुप कायद्याच्या निरसनालाही लागू होतील.".

*२६ जानेवारी १९७२ (१९७१ चा अधिनियम ४१, कलम ४ पहा).

Government Central Press, Mumbai

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४
  दूरध्वनी : ३६३ २६ ९३, ३६३ ०६ ९५
  ३६३ ११ ४८, ३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : ६६ ८८ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : ५२ २६ १५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१
  दूरध्वनी : ३३ १४ ६८,

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते